म. ग्रं. सं. ठाणें

विषय: इतिहास

संग्रहालय क्रमांक: १५० / १२२

लेखक: रावजी सखाराम गोडबोले

पुस्तकाचें नांव: महाराष्ट्र देशाचा सांप्रत इतिहास भाग १ला

सन: १८६६

६०

इति

# ग्रंथकर्त्याची सूचना.

महाराष्ट्रदेशाचें वर्णन आणि इतिहास ह्या नांवाचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ आजपर्यंत विद्याखात्यांत चालू आहे, त्याचें तें रूप बदलून दुसरा त्याच विषयावर एक लहानसा ग्रंथ तयार करण्याविषयीं मेहेरबान दैरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन् ह्यांचा हुकूम झाला. त्यावरून हा ग्रंथ तयार केला आहे. वरील ग्रंथांतल्यापेक्षां ह्या ग्रंथाची रचना प्रायः निराळी आहे व बहुतेक ठिकाणीं जास्त मजकूर घातला आहे.

जुन्या ग्रंथाचे एकंदर तीन भाग होते. त्यां पैकीं पहिला भाग नसावा, असें विद्याखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांचें मत पडल्यावरून तो भाग गाळला आहे.

ह्या नवीन ग्रंथाचे दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या भागांत माहाराष्ट्र देशाचा प्राचीन इतिहास, आणि दुसऱ्या भागांत त्याचा अर्वाचीन इतिहास, असे संक्षिप्त रूपानें लिहिले आहेत. दुसऱ्या भागाचीं दोन प्रकरणें केलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या प्रकरणांत शिवाजीराजा आणि त्याच्या वंशांतले दुसरे राजे ह्यांचें वर्णन केलें आहे; आणि दुसऱ्या प्रकरणांत पेशव्यांचें वर्णन केलें आहे. ह्या दोन्ही भागांस मुख्यत्वेंकरून ग्रांट दफ् साहेबांनीं केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा आधार घेतला आहे.

मेहेरबान मेजर क्यांडीसाहेब ह्यांनीं हा ग्रंथ तपासून यांतील पुष्कळ चुका दुरुस्त केल्या, त्याबद्दल ग्रंथ कर्त्ता यांचा परम आभारी आहे.

तारीख २७ माहे सप्तंबर सन १८७९.

मुकाम पुणें.

रा० स० गो०

THE DEPARTMENT OF PUBLIC INSTRUCTION, BOMBAY.

---

A

# SHORT HISTORY OF MAHÁRÁSHTRA

BY


RAOJI SADÁSHIVA GODBOLE.

*Secretary and Reviser to the Dakshiná Prize Committee.*


15,000 COPIES.


*Registered for copy-right under Government of India's Act XXV. of 1867.*


---


BOMBAY:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1876.


---


(ALL RIGHTS RESERVED.)


*Price 3½ Annas.*

BOMBAY:

PRINTED AT THE ANGLO-VERNACULAR PRINTING PRESS
No. 28, TANK STREET NEW NAGPADA,

BY

SHIWRAM SHRIDHAR JOSHI, MANAGER.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# महाराष्ट्रदेशाचा संक्षिप्त इतिहास.

हा ग्रंथ,


## रावजी सदाशिव गोडबोले,

दक्षिणा प्रैज कमितीचे सेक्रेतरी आणि रिवैजर


ह्यांनीं तयार केला.


१९,००० प्रती.



ह्या ग्रंथाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें नोंदिली असे.



मुंबई:

गवर्नमेंत सेंत्रल बुक-दिपो.

सन १८७६ इसवी.



ह्या ग्रंथासंबंधीं सर्व अधिकार सरकारानें स्वाधीन ठेविले आहेत.



किंमत साडेतीन आणे.

मुंबईत

घर नं० २८, ट्यांकरस्ट्रीट, नवा नागपाडा येथें,

अंग्लो-वर्नाक्युलर छापखान्यांत

शिवराम श्रीधर म्यानेजर यांणीं छापिला.

# भाग पहिला.

३
१३८
वा. ३. १२२ / २

## महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त प्राचीन इतिहास.

इ० सनाच्या १३०० व्या शतकाच्या अखेरीपर्यंत महाराष्ट्रदेशाचा इतिहास.

१. **महाराष्ट्र** देशामध्यें इसवी सनाचे पहिल्या शतकांत **शालिवाहन** नामें एक प्रख्यात राजा होऊन गेला. त्याची राजधानी **प्रतिष्ठान** नामक शहर होतें; त्यासच हल्लीं **पैठण** असें ह्मणतात. तो राजा शककर्ता झाला. त्याचा शक इसवी सनानंतर ७८। वर्षांनीं सुरूं झाला; त्या शकास **शालिवाहन** शक ह्मणतात. इ० सनाच्या १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत **महाराष्ट्र** देशाच्या इतिहासाची माहिती काय ती इतकीच भरंवसा ठेवण्याजोगी आहे. आतां त्यावेळच्या कांहीं कांहीं दंतकथा लोकांत प्रसिद्ध आहेत; परंतु त्या इतक्या असंबद्ध व अविश्वसनीय आहेत कीं, त्या इतिहासांत लिहिणें सर्वथा अयोग्य आहे.

दक्षिणेंत मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या.

२. ह्यानंतरची माहिती मुसलमान इतिहासकर्त्यांच्या लेखांवरून अशी कळते कीं, इसवी सनाच्या १४ व्या शतकांत **अल्लाउद्दीन खिलजी** ह्या नांवाच्या एका मुसलमान सरदारानें **नर्मदे**च्या दक्षिणेस प्रथम स्वारी केली. त्या स्वारींत त्यानें **देवगड** (ह्यालाच आतां **दवलताबाद** ह्मणतात) येथील **रामदेवराव जाधव** नांवाच्या हिंदू राजाचा पराभव करून त्याचें सर्व द्रव्य हरून नेलें. त्यानंतर **दिल्लीच्या** प-

ठाण राजांच्या सैन्यांनीं सर्व दक्षिण देश जिंकून व लुटून फस्त केला.

ब्राह्मणी वंश.

३. दिल्ली सरकारच्या पदरीं जाफरखान ह्मणून एक मुसलमान सरदार होता, त्यानें इ० सन १३५० ह्या वर्षाच्या सुमारास दक्षिणेंत स्वारी करून एक स्वतंत्र मुसलमानी राज्य स्थापिलें. हा जाफरखान पूर्वीं दिल्ली शहरांत कांगो नांवाच्या एका ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्या ब्राह्मणानें त्याचे उत्तम गुण पाहून त्यावर फार उपकार केले; आणि गुलामगिरींतून त्याची सुटका केली होती; ह्मणून पुढें जाफरखानानें वर लिहिल्याप्रमाणें स्वतंत्र राज्याची स्थापना केल्यावर त्या ब्राह्मणाचे उपकार स्मरून त्यानें आपल्या नांवास कांगो ब्राह्मणी अशीं अक्षरें जोडिलीं; आणि त्या ब्राह्मणास आपल्या जामदारखान्याचें काम सांगून सुखी केलें. त्याच्यामागें त्याच्या वंशांत जे बादशाह झाले, त्यांनींही ब्राह्मणी हेंच नांव पुढें चालविलें. ह्या कारणावरून त्या राज्यास इतिहासामध्यें दक्षिणेंतील ब्राह्मणी राज्य असें ह्मटलें आहे. ह्या राज्याची राजधानी प्रथम कलबुर्गें शहर होतें, नंतर बेदर शहर झालें.

महाराष्ट्रदेशांत दुष्काळ.

४. ब्राह्मणी राजे राज्य करीत असतां इ० सन १३९६ ह्या वर्षीं महाराष्ट्र देशांत १२ वर्षेंपर्यंत मोठा दुष्काळ पडला होता. त्यास दुर्गादेवी असें ह्मणतात. त्या बारा वर्षांमध्यें महाराष्ट्र देशांत पाऊस अगदीं पडला नाहीं, असें सांगतात. ह्या दुष्काळामूळें महाराष्ट्र देशाचा बराच भाग ओस पडून

गेला, आणि पुढें सुमारें तीस वर्षेंपर्यंत तेथें चांगली-शी वस्ती झाली नाहीं.

शिरके. ५. **ब्राह्मणी** राजांच्या कारकीर्दींत **कोंकणांत शिरके** म्हणून एक मोठा बलाढ्य सरदार होता. त्यानें मात्र त्यावेळीं मुसलमान लोकांबरोबर लढाया मारून आपलें संरक्षण केलें.

वास्कोदिगामा. ६. **ब्राह्मणी** राज्य बुडण्याचे सुमारास **पोर्तुगाल** देश-चा **वास्कोदिगामा** नांवाचा सरदार इ० स० १४९७ ह्या वर्षीं कांहीं लोकांसहित जलमार्गानें प्रथम **कालीकोट** बंदरांत आला; आणि इ० स० १५१० ह्या वर्षीं त्यानें **गोवें** शहर हस्तगत करून घेतलें. तें शहर अद्यापि **पोर्तुगीज** लोकांच्याच ताब्यांत आहे.

ब्राह्मणी राज्याचा नाश. ७. **ब्राह्मणी** राज्य सुमारें दीडशें वर्षेंपर्यंत चाललें. त्यांत इ० स० १४७८ ह्या वर्षापासून त्याला उतरती कळा लागली. ह्याचें कारण असें झालें कीं, तें राज्य अमर्याद वाढल्यामुळें मुलखाचे बंदोबस्ताकरितां नेमलेले सुभेदारच आपापल्या सुभ्यांमध्यें प्रबळ होऊन बादशाहाची आज्ञा जुमानीनातसे झाले. असें होतां होतां इ० स० १५०० ह्या वर्षाच्या सुमारास तें राज्य मोडून **विजापूरचें** राज्य, **गोवळकोंडचें** राज्य, **अहमदनगरचें** राज्य, **वऱ्हाडचें** राज्य, आणि **बेदरचें** राज्य, अशीं त्याचीं बेगळालीं पांच राज्यें झालीं. त्या राज्यांस अनुक्रमें **इदिलशाही**, **कुतुबशाही**, **निजामशाही**, **अमादशाही**, आणि **बरीदशाही**, अशीं उपनावें पडलीं होतीं. ह्या पांच राज्यांपैकीं शेवटचीं दोन राज्यें

लवकरच बुडालीं, परंतु पहिलीं तीन पुढें बलिष्ठ झालीं.

अहमदनगरच्या राज्याचा परिणाम.

८. इसवी सनाच्या पंधराव्या शतकाचे अखेरीस दिल्लीचा बादशाह **अकबर** ह्यानें वरील राज्यें बुडविण्याचा यत्न चालविला. त्या वेळीं त्या राज्यांचे एकमेकांशीं तंटे सुरू होऊन त्यांत अव्यवस्था झाली होती; व **अहमदनगर**चा बादशाह **बहादर निजामशाह** हा केवळ मूल असून त्याच्या दरबारी लोकांतही दोन फळ्या झाल्या होत्या; तेणेंकरून **अहमदनगर**च्या राज्यांत तर फारच बेबंद झाला होता; त्यामुळें तें राज्य सहज हस्तगत होईल असें पाहून तेंच घेण्याविषयीं **अकबरानें** प्रथम यत्न चालविला, व थोड्याच काळांत त्यानें त्या राज्याचा बहुतेक मुलूख घेतला. शेवटीं खुद्द **अहमदनगरावर** ही त्यानें सैन्य पाठविलें; ते समयीं त्या शहरांत **चांदबिबी** नांवाची कोणी एक स्त्री बादशाह **बहादर निजामशाह** ह्याची नातलग होती, तिनें त्या शहराचे रक्षणाकरितां विलक्षण पराक्रम केला, त्यामुळें लोक अद्यापि तिची कीर्ति गातात. परंतु ती आपल्या शहराचा बचाव करण्याकरितां झटत असतां तिला कोणीं दुष्टानें मारेकरी घालून मारविलें. त्यामुळें तें शहर मोंगलांच्या हातीं लागून त्यांनीं तेथील बादशाहास कैद केलें. तेव्हां **अहमदनगर**चें राज्य बुडण्याचा प्रसंग आलाच होता, पण त्या राज्यांत **मलिकंबर** नांवाचा एक अत्यंत बुद्धिमान् प्रधान होता, त्यानें **दौलताबादेस** दुसरा एक नवाच बादशाह करून तेथें **निजामशाही** राज्याची स्थापना केली, आणि त्या राज्यापैकीं जो मुलूख मोंगलांच्या हातीं लागला नव्हता,

याची व्यवस्था करण्यास आरंभ केला. त्यानें **दौलताबादेजवळ खिडकी** नांवाचें मोठें शहर वसवून ती **निजामशाही**ची राजधानी केली. हेंच शहर पुढें **अवरंगजेब** बादशाहानें आपल्या एका सुभ्याची राजधानी करून त्याचें नांव **अवरंगाबाद** ठेविलें. **मलिकंबरानें** प्रांताचा वसूल घेण्याचे वगैरे फार उत्तम नियम करून प्रजा सुखी केली. त्यामुळें लोक अद्यापि त्याचे गुण आठवितात. ह्याप्रमाणें तें राज्य पुनः कांहींसें आकारास येऊं लागलें तों, इ० स० १६२६ ह्या वर्षी **मलिकंबर** मृत्यु पावला. त्यामुळें तेथें पुनः पूर्वीप्रमाणें अव्यवस्था सुरू झाली. शेवटीं इ०स० १६३७ ह्या वर्षी **दिल्लीचा** बादशाह **शहाजहान** ह्यानें तें राज्य अगदींच बुडवून टाकिलें. ह्याप्रमाणें **अहमदनगरच्या** राज्याचा शेवट झाला.

विजापूर आणि गोवळकोंडें येथील राज्यांचा परिणाम.

९. **अहमदनगरचें** राज्य बुडालें ते वेळीं **विजापूर** व **गोवळकोंडें** ह्या दोन्ही राज्यांनाही उतरती कळा लागलीच होती. त्यांत विशेषेंकरून **महाराष्ट्र** देशामध्यें स्वतंत्र राज्याची स्थापना करणारा **शिवाजी** राजा ह्याच्या पराक्रमामुळें तर तीं फारच मोडकळीस आलीं. शेवटीं **अवरंगजेबानें** तीं दोन्हीं राज्यें इ० स० १६८७ ह्या वर्षी अगदींच मोडून टाकिलीं. हीं राज्यें सुमारें **दोनशें** वर्षेंपर्यंत स्वतंत्र होतीं.

# भाग दुसरा.

## महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त अर्वाचीन इतिहास.

## प्रकरण पहिलें.

### शिवाजी राजा आणि त्याच्या वंशांतील दुसरे राजे, ह्यांचें वर्णन.

### शिवाजी राजा ह्याचें वर्णन.

इ० सन १६२७ ह्यावर्षापासून १६८० ह्या वर्षापर्यंत.

त्याच्या पूर्वजांची हकीकत.

१. **शिवाजी** हा मराठी राज्याचा मूळ पाया घालणारा होय. ह्याच्या पूर्वजांचें उपनांव **भोंसले** असें होतें. हे **भोंसले दौलताबादेजवळ वेरूळ** ह्मणून गांव आहे, तेथें पूर्वी रहात असत. **भोंसल्यांच्या** कुळामध्यें **शिवाजीचा** आजा **मालोजी** हा पहिल्यानें, **शिंदखेरचा जाधवराव** ह्मणून एक सरदार होता त्याच्या आश्रयानें, **निजामशाही** सरकारचे चाकरीस राहिला. पुढें त्याच जाधवरावाची कन्या त्यानें आपला मुलगा **शाहाजी** ह्यास केली; ह्यामुळें त्याची योग्यता पुष्कळ वाढली; आणि त्याच सरकारांतून त्यास **शिवनेरी** व **चाकण** ह्या दोन्ही किल्यांची व त्यांचे खालीं असणाऱ्या मुलखाची मामलत मिळून, **पुणें** व **सुपें** ह्या परगण्यांची जाहगीर मिळाली.

शाहाजी व त्याचे पूत्र.

२. **मालोजीचा** मुलगा **शाहाजी** हा आपल्या बापाच्या मागें कांहीं दिवस **निजामशाही** सरकारचे आश्रयास होता. पुढें **दिल्लीचा** बादशाह **शहाजहान** ह्यानें तें राज्य बुडविलें, तेव्हां

तो **शहाजहानाचे** पदरीं राहिला. परंतु त्या बादशाहानें त्यास दिलेल्या इनामांपैकीं कांहीं इनामें परत घेतलीं, तेणेंकरून त्यास फार वाईट वाटलें आणि त्यानें मोंगलांची चाकरी सोडून देऊन **विजापूरच्या** बादशाहाचा आश्रय धरिला व मरे तोंपर्यंत त्याच्याच पदरीं चाकरी केली. तो इ० स० १६६४ ह्या वर्षी मरण पावला. त्या वेळीं त्याच्या ताब्यांत **पुणें, सुपें,** आणि **तंजावर** हे प्रांत होते. **शाहाजीची** पहिली बायको **जाधवरावाची** कन्या **जिजाबाई** हिजपासून त्याला दोन पुत्र झाले. त्यांपैकीं वडील पुत्र **संभाजी,** तो तरूण असतांच लढाईंत मेला. धाकटा **शिवाजी,** हा पुढें राजा झाला. **शाहाजीची** दुसरी बायको **मोहित्यांची** कन्या **तुकाबाई** ह्मणून होती, तिजपासून त्याला **व्यंकोजी** नांवाचा एक पुत्र झाला. तो **तंजावर** प्रांतांत आपल्या बापाची जाहगीर संभाळून असे.

शिवाजीचें जन्म व त्याचें लहानपणचें शिक्षण.

३. **शिवाजी** इ० सन १६२७ ह्या वर्षी **जुन्नराजवळ शिवनेरी** किल्यांत जन्मला. **शाहाजीनें** कर्नाटकांत आपले जाहगिरीवर जातेसमयीं, **पुणें** प्रांतीं त्याच्या एक **दादोजी कोंडदेव** नांवाचा मोठा चतुर आणि विश्वासूक कारभारी होता, त्याचे स्वाधीन **शिवाजी** व **जिजाबाई** ह्यांस केलें होतें. त्या **दादोजीच्या** सुसंगतीनें व त्याच्या उत्तम शिक्षणानें राज्यभार वाहण्यास योग्य असे पुष्कळ गुण **शिवाजीच्या** अंगीं आले. परंतु त्याला लिहिणें, वाचणें वगैरे अगदीं आवडत नसे. लिहिणें, वाचणें हीं कामें कारकुनांचीं आहेत असें समजून मराठे सरदार बहुधा ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष्य करितात. त्यांत **शिवा-**

जीला तर आपलें नांवही लिहितां येत नव्हतें असें ह्मणतात. तरी शूर सरदारास योग्य जे धनुर्विद्यादिगुण त्यांमध्यें तो प्रवीण होता. घोड्यावर बसणारा तर तो इतका पटाईत होता कीं, त्या वेळच्या सर्व मराठ्यांत तसा दुसरा कोणी ही नव्हता. भारत, भागवत, रामायण इत्यादि पुराणांतील युद्धांच्या कथा त्यास अतिशय आवडत असत. तशीच त्याची हिंदुधर्मावर अत्यंत भक्ति असून तो मुसलमानांच्या धर्माचा लहानपणापासून तिरस्कार करी. सारांश, त्याच्या अल्पवयांतच पुढें त्यानें केलेल्या पराक्रमाचा अंकूर दिसूं लागला.

त्याच्या पराक्रमाचा व सेनेचा आरंभ.

४. शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें आडदांड लोकांची संगति धरून मुलखांत पुंडाई आरंभिली. हा त्याचा दुर्वृत्तपणा पाहून दादोजीनें तो सोडून देण्याविषयीं त्याला वारंवार उपदेश केला, व त्याचें मन अशा हलकट कामांतून निघावें ह्मणून शाहाजीच्या जहागिरीचा बंदोबस्त करण्याचें काम त्यावर सोंपविलें. त्यांत त्याची सुबुद्धि व पोक्त विचार हीं ढळढळीत दिसून आलीं; त्या कामाच्या संबंधानें कित्येक मराठे सरदारांशीं दळणवळण ठेवून त्यानें आपल्या सद्गुणांच्या योगानें त्यां सरदारांची अत्यंत प्रीति संपादिली. लोकांमध्यें त्याची प्रतिष्ठा वाढत गेल्यामुळें मुसलमानलोकांच्या ताब्यांत न राहतां स्वतंत्रपणें वागण्याविषयींचा त्याच्या बुद्धीचा अंकूर उत्तरोत्तर वाढतच गेला, आणि त्यानें तदनुसार यत्नही सुरूं केला. तो असा; त्याने प्रथम घाटमाथ्यावरील मावळे लोक जमविण्याचा विचार केला. ते लोक अडाणी दि-

सत हें खरें, परंतु ते मोठे शूर व अत्यंत विश्वासूक असून त्यांना सांगितलेलें काम ते फार जीव लावून करीत. हे त्यांच्या अंगचे गुण **शिवाजीच्या** उद्देशाला फार अनुकूळ असल्यामुळें त्यानें त्यांच्याशीं फारच स्नेह केला. त्या मावळे लोकांमध्यें मुख्यत्वेंकरून **एसाजी कंक**, **तानाजी मालुसरा**, आणि **बाजी फसलकर** असे तिघे असामी त्याचे परम स्नेही होते. त्यांनीं शिवाजीला मावळच्या चोरवाटा व आसपासचे डोंगरी किल्ले ह्यांची चांगली माहिती करून दिली. तेव्हां त्या डोंगरी किल्यांपैकीं एकादा आपल्या ताब्यांत असावा असें मनांत आणून **शिवाजीनें** मावळे लोक जमा केले; आणि इ० स० १६४६ ह्यावर्षीं **विजापूरकरांच्या** ताब्यांतील **तोरणा** नांवाचा किल्ला, तेथील लोक वश करून, आपले स्वाधीन करून घेतला. पुढें त्या किल्याची डागडुजी करण्याकरितां त्यांत खणीत असतां त्याला एक मोहरांचा हंडा सांपडला. एकाएकीं इतकें पुष्कळ द्रव्य त्याच्या हातीं लागल्यामुळें त्याची कुलस्वामिनी भवानी हीच प्रसन्न होऊन त्याला द्रव्य देते, असें लोकांस वाटूं लागलें, त्यामुळें त्यांच्या मनांत त्याविषयीं अत्यंत पूज्य बुद्धि उत्पन्न होऊन पुष्कळ लोक त्याला अनुकूळ होऊं लागले. तेव्हां शिवाजीनें **तोरणा** किल्लयाचे आग्नेयी दिशेस दीड कोसावर दुसरा एक **राजगड** नांवाचा किल्ला बांधिला; आणि दारूगोळा वगैरे युद्धाचें सामान खरेदी करून दोन्ही किल्यांवर यथास्थित बंदोबस्त केला. ही सर्व हकीकत **विजापुरीं** कळल्यावर बादशाहास राग येऊन त्यानें **शाहाजीस** आपल्या मुलाचा बंदोबस्त क-

रावयास आज्ञा केली. शाहाजीनें ती मान्य करून दादोजीस लिहिलें कीं, हरएक युक्ति करून शिवाजीला वाटेवर आणा. त्याप्रमाणें दादोजीनें शिवाजीला पुष्कळ उपदेश केला. परंतु तो सर्व व्यर्थ गेला. दादोजी हा अगोदरच वार्धक्यानें पीडला होता, तितक्यांत शिवाजीचें असें आचरण पाहून आपल्या धन्यावर मोठीं दुर्धर संकटें येतणार अशी रात्रंदिवस काळजी लागल्यामुळें तर तो अगदीं खंगला आणि मरणोन्मुख झाला; शेवटीं मरतेसमयीं त्यानें शिवाजीस सांगितलें कीं, तुम्ही कसे ही वागा, पण एवढें करा कीं, गाई, ब्राह्मण, व प्रजा ह्यांचें योग्य पालन करून मुसलमानांपासून हिंदूंचीं देवस्थानें राखा. ही त्याची शेवटची आज्ञा शिवाजीनें शिरसामान्य करून मुसलमानांपासून मुलूख मिळविण्याकरितां मोठ्या झपाट्यानें उद्योग चालविला.

विजापूरकराच्या मुलुखामध्यें तो आपली सत्ता वाढवितो.

५. इ० स० १६४७ ह्या वर्षीं दादोजी कोंडदेव वारला; त्यानंतर शिवाजीनें थोडक्याच दिवसांत चाकणचा किल्ला, व पुरंदर, आणि कोंडाणें, हे किल्ले युद्धाचा प्रसंग न आणतां केवळ शहाणपणाच्या बळावर घेतले. कोंडाणें किल्ल्याचें त्यानें सिंहगड असें नांव ठेविलें. सुपें परगण्याच्या मामलेदारावर छापा घालून तो परगणा ही त्यानें घेतला. पुढें इ० स० १६४८ ह्या वर्षीं त्यानें कल्याणचा सुभा व कोंकणपट्टींतील बरेच किल्ले घेतले. त्यामुळें कोंकणपट्टींचा बहुतेक भाग त्याच्या साब्यांत येऊन शिवाजीचें ऐश्वर्य वाढलें; तेव्हां त्याला

मोठी उमेद येऊन त्यानें विजापूरकरांच्या मुलखांत फारच उपद्रव मांडिला.

६. तेव्हां, शाहाजीच्याच अनुकूलतेनें शिवाजीनें बंडावा माजविला असेल, असें विजापूरच्या बादशाहास वाटून त्यानें शाहाजीला धरून कैदेंत ठेविलें; आणि शिवाजी लवकर आपल्या अपराधाची क्षमा मागावयास न येईल तर तुझा जीव घेईन, असें बादशाहानें शाहाजीला भय घातलें. हें शिवाजीस कळतांच त्यानें दिल्लीचा बादशाह शहाजहान ह्याची चाकरी करण्याचें कबूल करून त्याजकडून विजापूरकरांस दहशत घालून आपल्या बापाची सुटका करविली. नंतर त्यानें पुष्कळ फौज ठेऊन आपल्या मुलखाचा बंदोबस्त चालविला. इ० स० १६५६ ह्या वर्षी त्यानें शामराजपंत नांवाच्या एका ब्राह्मणास पेशवा असें पद देऊन त्याला आपला मुख्य कारभारी केलें; आणि सारी कोंकणपट्टी हस्तगत करून घेण्याच्या इराद्यानें शामराजपंतावरोबर कांहीं फौज देऊन तो ( जंजिऱ्याच्या ) शिद्दीवर पाठविला. परंतु तेथें त्याचा पराभव झाला, त्यावरून शिवाजीनें त्याजकडून पेशवाईचा अधिकार काढिला आणि मोरोपंत पिंगळे ह्यास तो अधिकार देऊन त्याला शिद्दीवर पाठविलें. ह्याप्रमाणें शिवाजीचा दंगा पुनःचालू झाला; तेव्हां विजापूरच्या दरबारांत त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय होऊन त्या कामावर आफ्‌सुलखान नामें सरदाराची नेमणूक झाली. आफ्‌सुलखान फौजेसहित इ० स० १६५९ ह्या वर्षी शिवाजीच्या मुलखांत शिरला. शिवाजीनें प्रथम

विजापूरचा बादशाह शिवाजीचें पारिपत्याकरितां सरदार पाठवितो.

त्याशीं आर्जवानें वागून एकांतीं मसलत करण्याचा घाट घातला; आणि बोलण्याचे गर्दींत **आफूसुलखान** गैरसावध असतां त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून त्यानें त्यास ठार मारिलें. तेव्हां बादशाहानें **रुस्तुमजमान** नामें दुसरा एक सरदार **शिवाजी**वर पाठविला. त्याचा **शिवाजी**नें अगदीं मोड करून त्याला हाकून लाविलें, आणि **विजापुरा**पर्यंत मुलखाची खंडणी घेतली. नंतर एकदम **कोंकणां**त जाऊन त्यानें **दाभोळ** शहर लुटलें. हें समजतांच बादशाहानें **शिद्दीजोहार** नामें सरदारास त्यावर पाठविलें. त्यानें **शिवाजी पन्हाळा** किल्ल्यावर आहे अशी संधि पाहून त्या किल्ल्यास चोहोंकडून वेढा घातला. परंतु मोठी अक्कल लढवून **शिवाजी** तेथून निसटून गेला, त्यामुळें व **कर्नाटकां**मध्यें त्याच वेळेस बंडें उत्पन्न झालीं होतीं, तीं मोडण्याचें **विजापूर**च्या बादशाहास अगत्य पडल्यामुळें **शिवाजी**चें पारिपत्य करण्याचें काम कांहींसें मागें पडलें.

विजापूरकर निरूपाय होऊन त्याशीं तह करितात.

७. **विजापूरकरां**चें सैन्य **कर्नाटकां**त गुंतलें असें पाहून **शिवाजी**नें पुनः त्यांचे कित्येक किल्ले व **सांवतांचा वाडी**प्रांत घेतला. असा तो पराक्रमी झाल्यामुळें आपल्या हातून त्याचें पारिपत्य होणें कठीण असें समजून **विजापूरकरां**नीं इ० स० १६६२ ह्या वर्षीं त्याशीं तह केला. ह्या प्रसंगीं **कल्याणा**पासून **गोंव्या**पर्यंत सारी **कोंकणपट्टी** आणि **भिमे**पासून **वारणे**पर्यंत सुमारें १६० मैल लांबीचा घाटमाथा, इतका मुलूख **शिवाजी**च्या ताब्यांत होता. त्याच्या मुलखाची रुंदी **सह्या**-

पासून जंजिऱ्यापर्यंत सुमारें १०० मैल होती. ह्या वेळीं त्याचें सैन्यही पन्नास हजार स्वार आणि सात हजार पायदळ इतकें होतें.

शिवाजी मोंगलांचें मुलखावर स्वाऱ्या करूं लागतो.

८. शिवाजीला विजापूरकरांपासून भीति नाहींशी होऊन तो कांहींसा मोकळा झाल्यामुळें इ० स० १६६२ ह्या वर्षी तो दिल्लीच्या बादशाहाचे मुलखांत स्वाऱ्या करूं लागला. प्रथमतः त्यानें अवरंगाबादेपर्यंत मोंगलांचा मुलूख लुटून पुष्कळ द्रव्य जमा केलें. हें वर्त्तमान दिल्लीचा बादशाह अवरंगजेब ह्याला समजतांच त्यानें षाइस्तेखान नामें सरदार शिवाजीवर पाठविला. त्याचा शिवाजीनें अगदीं मोड करून त्याला आपल्या मुलखांतून हाकून लाविलें. नंतर इ० स० १६६४ ह्या वर्षी शिवाजीनें मोंगलांच्या ताब्यांतील सुरत शहर लुटून तेथून बहुत द्रव्य आणिलें. त्यावेळीं सुरतेस कांहीं इंग्रजलोक व्यापार करीत होते. त्यांनीं मोठ्या शौर्यानें आपलें व शहरच्या दुसऱ्या कितीएक लोकांचें संरक्षण केलें, त्यामुळें त्यांचें मात्र द्रव्य शिवाजीस सांपडलें नाहीं.

शिवाजी आपणास राजा ह्मणवितो व आपल्या नांवाचें नाणें पाडितो.

९. सुरत शहर लुटून शिवाजी माघारां रायगडास आला, तोंच त्याला शाहाजी बारल्याचें वर्त्तमान समजलें. तेव्हां तो कांहीं दिवस आपल्या मुलखाचा बंदोबस्त करीत तेथेंच राहिला. नंतर बापाच्या संबंधानें विजापूरकरांच्या पदरचा सरदार हें जें ह्या वेळपर्यंत शिवाजीकडे नातें होतें, तें उघडपणें टाकून देऊन त्यानें आपल्या नांवास राजा हा किताब

जोडिला, व आपल्या नांवाचीं नाणीं पाडण्याकरितां टांकसाळही घातली.

शिवाजीच्या पारिपत्याकरितां अवरंगजेबाचे दोघे सरदार येतात.

१०. पुढें इ० स० १६६९ ह्या वर्षी **शिवाजीनें** जलमार्गानें जाऊन **मलबार** किनाऱ्या वरील **वारशिलोर** नामें शहर लुटलें, आणि तेथून अपार द्रव्य आणिलें. ह्याच सुमारास त्याच्या लढाऊ गलबतांनीं **मक्केस** जाणारे कितीएक **मुसलमानांचे** यात्रेकरू लुटले. त्यामुळें **अवरंगजेबास** फारच राग येऊन त्यानें **दिलिरखान** व **जयसिंग** ह्या नांवाच्या दोघां पराक्रमी सरदारांबरोबर मोठें सैन्य देऊन त्यांना **शिवाजीवर** पाठविलें. त्यांनीं एकाएकी **शिवाजीच्या** मुलखांत शिरून मोठा अनर्थ मांडिला. त्यामुळें **शिवाजीला** तयारी करण्यास ही अवसर सांपडला नाहीं. **मराठी** राज्याची स्थापना होत आहे तोंच त्यावर हें मोठें अरिष्ट आलें, त्यामुळें तें खचित बुडेल असें दिसूं लागलें. परंतु कोणत्या प्रसंगीं कसें वागावें हें **शिवाजी** फार चांगलें जाणत होता. तो आपण होऊन त्या सरदारांच्या भेटीस गेला, आणि कांहीं जाहगीर घेऊन मी बादशाहाची चाकरी करण्यास राजी आहें; असें त्यानें त्यांजपाशीं कबूल केलें. हें त्याचें म्हणणें **जयसिंगानें** **अवरंगजेब** बादशाहास कळविल्यावर त्यानें ही तें मान्य केलें आणि **विजापूरकरांवर** स्वारी करण्याचे कामीं **जयसिंगाला** त्वां मदत करावी अशी त्याला आज्ञा केली. अशा रीतीनें आपणावर आलेलें **अरिष्ट** **शिवाजीनें** टाळलें.

११. **अवरंगजेबाच्या** आज्ञेप्रमाणें **जयसिंगा**बरोबर **विजापूरा**वर स्वारी करावयास निघण्याचे पूर्वी, **शिवाजीनें अवरंगजेबास** विनंती पत्र पाठवून **विजापूरकरांच्या** कांहीं मुलखाची * चौथाई आणि * सरदेशमुखी हे दोन हक्क मागितले. **अवरंगजेबाचे** मनांत **विजापूरचें** राज्य अगदीं बुडवावयाचें होतें; सबब त्या कामांत **शिवाजीचा** फार उपयोग होईल असें मनांत आणून त्यानें **शिवाजीचें** मागणें कबूल केलें. तेव्हां तो कांहीं फौज घेऊन **जयसिंगा**बरोबर **विजापूरकरां**वर गेला; व त्यांशीं युद्ध करितेसमयीं त्यानें असा कांहीं विलक्षण पराक्रम केला कीं, तो ऐकून **अवरंगजेब** बादशाह फार खुष झाला आणि त्यानें त्याला बहुमानाचीं वस्त्रें पाठवून **दिल्लीस** भेटावयास बोलाविलें.

चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क मराठे लोकांस पहिल्यानें कसे उत्पन्न झाले, तो प्रकार.

१२. बादशाहाचें बोलावणें कबूल करून **शिवाजी** आपला पुत्र **संभाजी** ह्यासहवर्तमान इ० स० १६६६ ह्या वर्षी **दिल्लीस** त्याला भेटावयास गेला. परंतु बादशाहानें त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचा सन्मान केला नाहीं; त्यामुळें त्यानें राग आल्याचें चिन्ह दर्शविलें; तेवढ्यावरून बादशाहानें त्याला प्रतिबंधांत ठेविलें. असें त्याचें कपट पाहून **शिवाजीनें** ही त्याच्याशीं कपट लढविलें. तें असें कीं, दरबारच्या लोकांशीं स्नेह करून तो कित्येक दिवस मोठ मोठ्या बुरडी पेटाऱ्यांत मिठाई वगैरे भरून

शिवाजी दिल्लीस जाऊन येतो.

---

* चौथाई ह्मणजे प्रांताच्या एकंदर वसुलाचा चतुर्थांश; आणि सरदेशमुखी ह्मणजे त्याच वसुलाचा दशांश.

त्यांजकडे नजराणा पाठवूं लागला. पुढें एके दिवशीं आपण व आपला पुत्र उभयतां दोहों पेटाऱ्यांत बसून माणसांकडून त्यानें ते पेटारे शहराबाहेर संकेताचे जागीं नेवविले; आणि तेथें घोड्यावर बसून दोघे दक्षिणेंत पळून आले.

१३. **शिवाजी** आपल्या हातांतून निसटला, हें पाहून **अवरंगजेबास** फार वाईट वाटलें; तेव्हां त्यानें अशी क्लृप्ति योजिली कीं; पुनः त्याला आपली कृपा दर्शवून प्रसंग येईल तेव्हां दगा करावा, अशा हेतूनें त्यानें इ० स० १६६७ ह्या वर्षी **शिवाजी**च्याच विनंतीवरून त्याला राजा हा किताब देऊन **वऱ्हाड** प्रांतांत कांहीं जाहगीर ही दिली.

त्याला अवरंगजेबापासून राजा हा किताब मिळतो.

१४. ह्याप्रमाणें **अवरंगजेबानें** बाह्यात्कारें **शिवाजीस** आपली कृपा दर्शविली, तरी **शिवाजी** त्याचें कपट ओळखूनच होता, म्हणून त्यानें आपल्या सावधपणांत अंतर पडूं दिलें नाहीं. तेव्हां हा एकादे वेळीं घात करील असें **अवरंगजेबाला** भय पडून त्यानें आपला दक्षिणेंतील सुभेदार **सुलतान माजूम** ह्यास **शिवाजीला** पकडण्याविषयीं हुकूम केला. हें **शिवाजी**ला कळतांच तो सावध होऊन **मोंगलांच्या** ताब्यांत गेलेला आपला मुलूख पुनः घेण्याच्या उद्योगास लागला. इ० स० १६७० ह्या वर्षी प्रथमतः त्यानें **तान्हाजी मालुसरा** ह्यास फौजेसहित पाठवून **सिंहगड** किल्ला परत घेतला. पण लढाईत **तान्हाजी मालुसरा** पडला; तेणें-

मोंगलांनीं घेतलेला मुलूख शिवाजी पुनः त्यांजपासून घेतो.

करून शिवाजीची मोठी हानि झाली. त्याच वर्षी त्याने **पुरंदर** वगैरे पुष्कळ किल्ले घेऊन **सुरत** शहर पुनः लुटलें; आणि परत येते वेळेस त्याच्या मागें **मोंगल** लोकांचें एक सैन्य लागलें होतें, त्याची त्यानें अगदीं दाणादाण करून सोडिली. नंतर त्यानें आपला सेनापति **प्रतापराव गुजर** ह्याला फौज देऊन **मोंगलाच्या** ताब्यांतील **खानदेश** प्रांत लुटावयास पाठविलें. त्यानें **खानदेशांत** जाऊन बहुत लुटालूट केली; आणि तेथील बहुतेक गांवच्या लोकांपासून आम्ही दरसाल **शिवाजीस** चौथाई देत जाऊं असा करार लिहून घेतला. हें सर्व वर्त्तमान **अवरंगजेबास** लागतांच त्यानें **मोहबतखान** नामें सरदार **शिवाजीवर** पाठविला. तो इ० स० १६७२ ह्या वर्षी दक्षिणेंत येऊन पोहोंचतांच **शिवाजीनें प्रतापराव गुजर** ह्यास त्यावर पाठविलें. त्यानें **मोंगलांचा** पराभव करून त्यांची अशी धांदल उडवून दिली कीं, ते जीव घेऊन **अवरंगाबादेकडे** पळत सुटले. ह्याप्रमाणें **शिवाजीला** कोणी शत्रु नाहींसा होऊन पूर्वीं ज्या **अवरंगजेबाच्या** आज्ञेनें **विजापूरकरांच्या** मुलखावर त्यानें चौथाई बसविली होती त्याच **अवरंगजेबाच्या** मुलखावर त्यानें ती हल्लीं बसविली. ह्या वेळेपासून पुढें **मराठे** लोक नेहमीं **मोंगलांचे** मुलखीं चौथाई घेऊं लागले. ह्याखेरीज **गोवळकोंडचा** बादशाह आणि **विजापूरचा** बादशाह हे ही **शिवाजीपासून** आपणांस उपद्रव न व्हावा म्हणून दरसाल त्याला गुप्तरूपें अनुक्रमें पांच लक्ष आणि तीन लक्ष रुपये देत असत.

१५. इ०स० १६७३ ह्यावर्षीं शिवाजीनें सैन्य पाठवून विजापूरकरांचें संपत्तीनें भरपूर असें हुबळी नामें मोठें शहर लुटलें, आणि तेथून मनस्वी द्रव्य आणिलें. ह्या खेरीज त्यानें साताऱ्याचा किल्ला व दुसरे कांहीं त्यांच्या ताब्यांतील किल्ले घेतले. तेव्हां विजापुराहून त्याच्या पारिपत्यास लष्कर आलें, तें प्रतापराव गुजरानें पिटवून लाविलें. परंतु तें लष्कर लुटण्याची संधि सांपडली असतां त्यानें तें लुटलें नाहीं; म्हणून शिवाजीला राग येऊन त्यानें प्रतापरावाची निर्भर्त्सना केली. तीमुळें प्रतापरावास त्वेष येऊन तो एकाएकीं पुनः विजापूरकरांच्या लष्करावर चालून गेला; पण फौजेचा बंदोबस्त बरोबर नसल्यामुळें तो प्राणास मुकला, आणि त्याच्या सैन्याची दुर्दशा झाली. इतक्यांत हंसाजी मोहिते नामें शिवाजीचा पांच हजार स्वारांचा सरदार होता, त्यानें विजापूरकरांच्या सैन्यावर पडून त्यांचा अगदीं मोड केला, आणि प्रतापरावाचे लोक वाचविले. हें शिवाजीला समजतांच त्यानें हंसाजीचें हंबीरराव मोहिते असें नवें नांव ठेवून तो प्रतापरावाच्या जागीं सेनापति केला.

प्रतापरावाचा मृत्यु व हंबीरराव मोहित्याची हकीकत.

१६. ह्याप्रमाणें सर्वत्र विजयी होऊन शिवाजीनें इ० स० १६७४ ह्या वर्षीं मोठ्या समारंभानें रायगडावर आपणास राज्याभिषेक कराविला; आणि राज्याचा वसूल घेण्याचे वगैरे उत्तम प्रकारचे नियम ठरवून रयतेला सुख देण्याचा यत्न चालविला. त्यानें आपल्या राज्याच्या व्य-

तो आपणास राज्याभिषेक करवून राज्याची व्यवस्था करितो.

वस्थेकरितां एकंदर आठ प्रधान नेमिले होते; म्हणून त्यांस अष्टप्रधान अशी संज्ञा होती. त्यांचे किताब व कामें येणें प्रमाणें:—

| किताब. | कामें. |
|---|---|
| १ पेशवा अथवा मुख्य प्रधान. | मुख्य दिवाणगिरी. |
| २ पंत अमात्य.... | जमाबंदी व खर्चाची चौकशी. |
| ३ पंत सचीव .... | दप्तरदारी व बारनिशी. |
| ४ मंत्री.......... | खासगी शिबंदीची व्यवस्था व वाकानिशी. |
| ५ सेनापति....... | साऱ्या फौजेची व्यवस्था. |
| ६ सुमंत........... | पर राज्यांशीं वकिली करणें वगैरे. |
| ७ न्यायाधीश..... | न्याय करणें. |
| ८ पंडितराव...... | शास्त्रार्थ सांगणें. |

शिवाजीची कर्नाटकावर स्वारी.

१७. ह्याप्रमाणें राज्याचा बंदोबस्त केल्यावर शिवाजी तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ बरोबर घेऊन इ० स० १६७७ ह्या वर्षी **कर्नाटकांत** शिरला; आणि तेथें **विजापूरकरांच्या** मुलखांतून चौथाई व सरदेशमुखी ह्यांबद्दल ऐवज घेऊन, **तंजावरास** त्याचा भाऊ **व्यंकोजी** होता, त्याजपाशीं आपल्या बापाच्या जाहगिरीचा वांटा मागूं लागला. तें कबूल न करितां **व्यंकोजीनें** त्याच्या लष्करावर छापा घातला; परंतु **शिवाजीचा** बंदोबस्त कडेकोट असल्यामुळें त्याचाच पराभव होऊन त्याला जाहागिरीचा वांटा देणें प्राप्त झालें. **शिवाजीनें** तो सारा वांटा न घेतां ममताळुपणानें वडिलाची बहुतेक जाहागीर त्याच्या स्वाधीन केली. नंतर **कर्नाट-**

कांतला बराच मुलूख काबीज करून **शिवाजी रायगडास** परत आला.

शिवाजी मोंगलांपासून विजापूरकरांचा बचाव करितो.

१८. इ० स० १६७९ ह्या वर्षीं **अवरंगजेबानें दिल्हिरखान** नामें सरदार **विजापूरचें** राज्य बुडविण्याच्या उद्देशानें पाठविला. तेव्हां **विजापूरच्या** बादशाहानें **शिवाजीचें** आर्जव करून त्याजपाशीं मदत मागितली. तेसमयीं **शिवाजीनें** त्या **दिल्हिरखानावर** सैन्य पाठवून त्याचा अगदीं पराभव केला; आणि त्याला **विजापूर** प्रांतांतून हाकून लाविलें. ह्याप्रमाणें **विजापूरच्या** बादशाहाचा बचाव करून **शिवाजीनें** त्याजपासून **कर्नाटक** व दुसरे कांहीं प्रांत ह्यांचें पूर्ण स्वामित्व मिळविलें.

शिवाजीचा मृत्यु व त्याची संतति.

१९. अशा रीतीनें आपला पराक्रम साऱ्या दक्षिणेंत गाजवून **शिवाजी रायगडास** येऊन राहिला. तेथें त्याला गुडघी नांवाचा रोग होऊन तो इ० स० १६८० ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. त्याला दोन पुत्र होते. वडील पुत्राचें नांव **संभाजी** आणि धाकट्या पुत्राचें नांव **राजाराम**. हे दोघे सावत्र भाऊ होते.

त्याचे गुण आणि वर्तन वगैरे.

२०. **शिवाजीनें** केवळ रानटी लोकांच्या मदतीनें एवढ्या मोठ्या राज्याची स्थापना केली, फक्त ह्याच गोष्टीवरून त्याच्या अंगचें चातुर्य व शौर्य हीं स्पष्ट दिसून येतात. तो महाशूर असून राज्य कारभारांत ही मोठा

दक्ष होता. त्यानें प्रजेच्या रक्षणाकरितां कितीएक नवे नियम केले. त्याला इतकी पुष्कळ संपत्ति मिळाली, तरी तो तिचा अयोग्य रीतीनें व्यय करीत नसे. तो आपल्या शिपाई लोकांस वगैरे वारंवार बक्षिसें देऊन त्यांस संतुष्ट राखीत असे; व आबालवृद्धांशीं अगदीं नम्रपणानें वागे. आतां तो कांहीं प्रसंगीं क्रूरपणानें व कपटानें वागला, ही गोष्ट त्याच्या इतर गुणास बट्टा आणणारी होती खरी; तरी एकंदरींत त्याच्यामध्यें पुष्कळ अलौकिक गुण होते ह्यांत संशय नाहीं; म्हणूनच **मराठे** लोक त्याला अवतारी पुरुष समजतात.

त्याच्या राज्याचा विस्तार.

२१. **शिवाजी** मृत्यु पावला त्यावेळीं सारें **कोंकण, पुणें**प्रांत, आणि **कर्नाटकां**तील व दुसरेकडील कांहीं प्रांत इतके त्याचे स्वाधीन होते. त्याच्या प्रांतांत मुळचेच डोंगरी किल्ले पुष्कळ होते आणि त्यानें ही बरेच बांधिले. त्यांत **राजगड** आणि **प्रतापगड** हे मुख्य होते. ह्या सर्व डोंगरी किल्ल्यांवर शिबंदी लोक ठेवून त्यानें आपल्या मुलखाचा बंदोबस्त राखिला होता. त्याचें राहणें ही बहुतकरून डोंगरी किल्ल्यांत असे. त्याच्या गादीची जागा सहिल्यानें **राजगड** किल्ला होता, आणि पुढें **रायगड** किल्ला झाला.

त्याच्या वेळेस उत्कर्ष पावलेले सांप्रतचे मराठे बडे लोक.

२२. **शिवाजीनें** वसुलाचे कामावर नेमिलेला **आबाजी सोनदेव** ह्याच्या वंशांतील पुरुषांकडे **साताऱ्च्या** राज्याच्या शेवटापर्यंत पंत अमात्याचें काम होतें. **शिवाजीचा** सेनापति **हंबीरराव**

**मोहिते** ह्याच्या वंशांतील पुरुषांकडे त्याच राज्याच्या अखेरीपर्यंत तेथील स्वारांचा मुख्य अधिकार होता. **शिरके** ह्या नांवाच्या ज्या सरदाराचें वर्णन दुसऱ्या भागांत केलें आहे, त्याचा वंश हल्लीं कोंकणांत आहे. परंतु त्यांत कोणी आतां फारसा प्रसिद्ध नाहीं. **मुधोळकर घोरपडे** म्हणून **विजापूरकरांचा** एक सरदार होता; त्याच्या सरंजामास जो मुलूख त्या वेळेस चालत होता, तो अद्यापि त्याच्या वंशाकडे तसाच चालत आहे.

---

## संभाजीराजा ह्याचें वर्णन.

इ० स० १६८० ह्या वर्षापासून १६८९ ह्या वर्षापर्यंत.

१. **शिवाजीच्या** मागून त्याचा वडील पुत्र **संभाजी** हा त्याचे गादीवर बसला. त्या वेळेस त्याचें वय तेवीस वर्षांचें होतें.

तो गादीवर बसतो.

**संभाजी** कांहींसा आपल्या बापासारखा शूर होता. परंतु स्वभावानें अत्यंत क्रूर व दुर्व्यसनी असल्यामुळें तो राज्याधिकारास मुळींच लायक नव्हता. गादीवर बसतांच त्यानें कांहीं गोष्टींत आपल्या खराब स्वभावाचा मासला दाखविला. त्यामुळें त्याचा सावत्र भाऊ **राजाराम** ह्यास गादीवर बसविण्याविषयीं कांहीं सरदार लोकांनीं यत्न चालविला. तो त्यास समजतांच त्यानें त्या लोकांस व **राजारामाचे** आईस अत्यंत क्रूरपणानें ठार मारिलें, ह्यामुळें तर तो लोकांचे मनांतून फारच उतरला.

त्याचा स्वभाव.

२. त्यानें आपल्या बापाच्या वेळच्या शहाण्या प्रधानांचा धिक्कार करून **कलुशा** नांवाचा एक **कनोजी** ब्राह्मण होता त्याजकडे सर्व राज्याचा कारभार सांगितला.

त्याची राज्य चालविण्याची रीति.

तो ब्राह्मण राज्यकारभाराला योग्य नसतां ही **संभाजीनें** त्याचें माहात्म्य इतकें वाढविलें कीं, त्याच्याशिवाय तो कोणाचेंच ऐकेनासा झाला; आणि स्वतां यथेच्छ वागूं लागला.

३ **संभाजीच्या** अशा दुराचरणामुळें त्याच्या बापाच्या वेळचा जो बंदोबस्त होता तो अगदीं नाहींसा होऊन, राज्यांत फार अव्यवस्था सुरू झाली. ह्या खेरीज त्याच वेळेस **अवरंगजेब** बादशाह मोठी फौज घेऊन दक्षिण देश घ्यावयाकरितां आला, आणि त्यानें इ० स० १६८९ ह्या वर्षापर्यंत बराच मुलूख काबीज केला. अशा प्रसंगीं आपलें राज्याचा बचाव झटून करावा तो नकरून **संभाजी** दुर्व्यसनांत निमग्न राहिला आणि गैरसावधपणानें वागूं लागला. शेवटीं कोणेएके वेळीं तो **संगमेश्वराजवळ** निर्भयपणें शिकारीस गेला असतां त्याला व **कलुशा** ब्राह्मणाला **मोंगलांनीं** अकस्मात् धरून कैद केलें. कैदेंत असतां तो **अवरंगजेब** बादशाहास कांहीं टाकून बोलला, म्हणून **अवरंगजेबानें** त्याला व **कलुशा** ब्राह्मणाला **तुळापूर** येथें हालहाल करून ठार मारिलें. ह्याप्रमाणें इ० स० १६८९ ह्या वर्षीं त्याचा अंत झाला. त्यानें सुमारें ९ वर्षें राज्य केलें.

त्याच्या वाईट वागणुकीचा परिणाम.

# राजाराम ह्याचें वर्णन.

इ० स० १६८९ ह्या वर्षापासून १७०८ ह्या वर्षापर्यंत.

राजाराम गादीवर बसतो.

१. **संभाजी** मरण पावला त्यावेळीं त्याचा पुत्र **शिवाजी** (त्यासच पुढें **शाहूराजा** असें नांव मिळालें) व त्याची आई **एसूबाई**, ह्या उभयतांस **मोंगलांनीं** कैदेंत ठेविलें होतें, म्हणून **संभाजीचा** सावत्र भाऊ **राजाराम** ह्याजकडून राज्यकारभार चालवावा, असें कितीएक **मराठे** सरदारांनीं ठरविलें आणि त्याला राज्याभिषेक केला.

त्याच्या कारकीर्दींत झालेल्या गोष्टी.

२. **राजारामानें सातारा** येथें आपली गादी स्थापिली. त्याच्या कारकीर्दींत अष्ट प्रधानांमध्यें बरीच बदलाबदल झाली. **प्रल्हाद निराजी** नांवाचा एक फार शहाणा ब्राह्मण होता. त्यानें **मराठे** सरकारचीं फार मोठमोठीं कामें करून बिकट संकटांमध्यें राज्याचा बचाव केला; म्हणून **राजारामानें** त्याला पंतप्रतिनिधी असा नवाच किताब देऊन तो अष्ट प्रधानांपेक्षां वरिष्ट केला. **संताजी घोरपडे** सेनापति ह्यानें ही पुष्कळ पराक्रमाचीं कृत्यें केलीं, त्यांबद्दल त्याचा सन्मान करण्याकरितां **राजारामानें** एक नवें निशाण करून त्याच्या स्वाधीन केलें. त्या निशाणाचें नांव जरीपटका असें ठेविलें होतें. हें **मराठ्यांचें** निशाण पिंवळ्या फडक्याचें होतें. त्यासच भगवा झेंडा असें म्हणत.

३. **संभाजी**च्या कारकीर्दींत व तो मेल्यानंतर काहीं

मराठे लोकांचा उत्कर्ष.

दिवस राज्यामध्यें फारच बखेडा झाला होता. परंतु अशा प्रसंगीं **धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे**, व दुसरे कितीएक महाप्रतापी सरदार उदयास येऊन त्यांनीं जो पराक्रम केला, व **प्रल्हाद निराजी** याणें राज्यव्यवस्थेसाठीं जे शहाणपणाचे उपाय योजिले, त्यांच्या योगानें तो सारा बखेडा मोडला, इतकेंच नाहीं; तर **अवरंगजेब** आपल्या मोठ्या फौजेसहित स्वत: **मराठ्यांशीं** लढत असतां ही त्या सरदारांनीं त्याला कितीएक प्रसंगीं फार जेरीस आणून **मोंगल** लोक अगदीं बलहीन करून सोडिले. त्यामुळें तर **मराठे** लोकांचा फारच उत्कर्ष झाला.

४. **राजाराम** अकरा वर्षें राज्य करून इ० स० १७००

राजारामाचा मृत्यु व स्वभाव.

ह्या वर्षीं **सिंहगडा**वर मृत्यु पावला. तो कांहींसा शूर होता; परंतु त्यामध्यें राज्यकारभाराचें चातुर्य नव्हतें. त्याच्या गुणांमध्यें दया आणि दातृत्व हे दोन गुण मुख्य होते.

५. **राजारामा**चे मरणानंतर त्याची वडील बायको

ताराबाई आणि शिवाजी ह्यांची हकीकत.

**ताराबाई** हिनें आपला पुत्र **शिवाजी** ह्यास राज्यावर बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालविला. त्या वेळेस त्या **शिवाजी**चें वय १० वर्षांचें होतें.

६. **राजाराम** मृत्यु पावतांच, **अवरंगजेबास** वाटलें

अवरंगजेबाचा मृत्यु.

कीं, आतां **मराठे** लोकांत पुन: धामधुमी चालू होतील, म्हणून त्यांस जिंकण्यास आपणास कठीण पडणार नाहीं. अशा सम-

जुतीनें त्यानें मराठ्यांचें राज्य अगदीं बुडवून टाकण्याचा यत्न सुरू केला; परंतु तो सिद्धीस न जातां त्याला अहंमदनगरीं परत यावें लागलें. तेथें तो इ० स० १७०७ ह्या वर्षीं मृत्यु पावला.

## शाहूराजा ह्याचें वर्णन.

इ० स० १७०८ ह्या वर्षापासून १७४९ ह्या वर्षापर्यंत.

शाहूराजाची कैदेंतील हकीकत व ह्यास शाहू हें नांव पडण्याचें कारण.

१. संभाजीची बायको एसूबाई व तिचा पुत्र शिवाजी ह्यांस अवरंगजेबानें कैदेंत ठेविलें होतें, असें पूर्वीं सांगितलें. परंतु कोणत्या ही प्रकारें जाच न करितां त्यानें उलटें त्या उभयतांस आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें वागाविलें. अवरंगजेबाची कन्या तर ह्या मायलेकांवर फारच प्रीति करीत असे. शिवाजीला कैदेंतून मुक्त करावें असा विचार करून अवरंगजेबानें आपल्या पदरच्या दोघा मोठ्या मराठे सरदारांच्या कन्यांशीं त्याचीं लग्नें केलीं आणि त्याला कांहीं प्रांताची जाहगीर ही करून दिली. हा शिवाजी कैदेंत असतां, त्याच्या आजांच्या लुटारूपणामुळें आपलें जे नुकसान झालें होतें, त्याचें अवरंगजेबाला स्मरण झालें म्हणजे तो त्या शिवाजीला "शिवाजी लुटारू" आणि ह्याला "शिवाजी शाहू" (साव) असें विनोदानें म्हणे. ह्यावरून त्याचें नांव शाहू पडलें. अवरंगजेब मृत्यु पावल्यानंतर त्याचा पुत्र आजिमशाहा ह्यानें शाहूला कैदेंतून

सोडून दक्षिणेंत आपल्या राज्यावर **जाव**यास आज्ञा दिली. त्यापूर्वी तो एकंदर सत्रावर्षे **कैदेत होता.**

शाहूस राज्याची प्राप्ति व कोल्हापूरच्या राज्याची स्थापना.

२. सुटका होतांच **शाहूराजा दक्षिणेंत** येऊन पोहोंचला आणि **ताराबाई**पाशीं आपलें राज्य मागूं **लागला.** परंतु तिच्या मनांत तें त्याला द्यावयाचें नव्हतें, म्हणून **हा शाहू न**व्हे, कोणी तोतया आहे, असें ती म्हणूं लागली. तेव्हां **शाहूनें** कांहीं **मराठे** सरदार वश करून घेऊन **ताराबाईशीं** युद्ध केलें, आणि तिचा पराभव करून **साताराची गादी** मिळविली. त्यावेळेस त्याचें वय २४ वर्षांचें होतें. पुढें **ताराबाई** आणि तिचा पुत्र शिवाजी ह्यांनीं कांहीं काळपर्यंत राज्यप्राप्तीकरितां उद्योग केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं त्या दोघांनीं **कोल्हापुराजवळ** जो **पन्हाळा** किल्ला आहे तो हस्तगत करून घेऊन **कोल्हापुरास** एका नवीन स्वतंत्र राज्याची स्थापना केली. **कोल्हापुरास** हल्लीं जो राजा आहे तो त्यांच्याच वंशजांपैकीं **आहे.**

अक्कलकोटच्या राजांचा मूळपुरुष.

३. **शाहूराजा कैदेतून सुटून सैन्यासहित** ताराबाईशीं युद्ध **करावयाकरितां मराठी** राज्यांतून जात असतां, ताराबाईच्या पक्षाचे **जे** गांव होते त्यांपैकीं एका गांवच्या लोकांनीं त्याच्या सैन्यावर एकाएकीं हल्ला केला. तेव्हां **शाहूनें लुटून** तो गांव **घेतला.** ह्या युद्धाच्या गर्दींत त्याच गांवची कोणीएक बायको आपला मुलगा शाहूचे पायांवर टाकून म्हणाली कीं, “हा मूल मी तुमच्या सेवेस अर्पिला आहे.” तेव्हां **शाहूनें** तो मुलगा ठेवून

घेतला; आणि ह्या गांवीं आपला पहिल्यानें जय (फत्ते) झाला, हा उत्तम शकून झाला असें समजून त्यानें त्या मुलाचें नांव **फत्तेसिंग** ठेविलें; तोच पुढें **शाहूनें अक्कलकोटचा** राजा केला. तो **फत्तेसिंग** हल्लींच्या **अक्कलकोटच्या** राजांचा मूळपुरुष होय.

शाहूची राज्यव्यवस्था.

४. **शाहुराजा** राज्य करूं लागला, तेव्हां **मराठी** राज्यांत फार अव्यवस्था असून वसूल घेण्याविषयीं कांहींच नियम नव्हता. सेनापति **धनाजी जाधव** ह्याजकडे वसुलाचें काम होतें. त्यानें तें काम करण्याकरितां **आबाजी पुरंदरे—सासवडचा** कुळकरणी (हाच हल्लींच्या **पुरंदऱ्यांचा** मूळपुरुष) आणि **बाळाजी विश्वनाथभट—श्रीवर्धनचा** कुळकरणी, असे दोन कारकून ठेविले होते. हे दोघे पुढें फार प्रसिद्धीस आले. **धनाजी जाधव** वारल्यानंतर **बाळाजी विश्वनाथ** ह्यास त्याचें काम मिळालें व **शाहूचें** दरबारांत राज्यप्रकरणीं मुख्यत्वें मसलत ह्याचीच घेऊं लागले. **पेशवाईचें** काम **बहिरोपंत पिंगळे** ह्याजकडे होतें, तें त्याजकडून काढून **शाहूनें बाळाजी विश्वनाथ** ह्यास दिलें; आणि **आबाजी पुरंदरे** हा त्याचा *मुतालीक केला. **बाळाजी विश्वनाथ** हा **पेशवाईचें** काम करूं लागल्यापासून त्याच्या चातुर्यामुळें **मराठे** लोकांची सत्ता अधिकाधिक वाढत चालली.

शाहूचा मृत्यु.

५. **शाहूराजा** कैदेंतून सुटल्यानंतर ४२ वर्षें राज्य करून इ० सन १७४९ ह्या वर्षीं मृत्यु पावला. तेवेळीं त्याचें वय ६६

---

* शिक्कनीस—म्हणजे वरिष्ठ अमलदाराचा शिक्का वाळगणारा.

वर्षांचें होतें. त्यास संतान नव्हतें. त्यानें आपल्या अंतकाळीं **बाळाजी बाजीराव पेशवा** ह्यास अशी सनद करून दिली कीं, माझ्या पाठीमागें **ताराबाईचा** नातू **रामराजा** हा दत्तक घेऊन गादीवर बसवावा; आणि **शिवाजीराजाचे** वंशजांचा सन्मान मात्र राखून तुम्ही संपूर्ण राज्याचा अधिकार चालवावा.

त्याचा स्वभाव.

६. शाहूराजा लहानपणीं **अवरंगजेबापाशीं** कैदेंत असतां त्याचा काळ फारच ऐषआरामांत गेला होता. त्यामुळें मोठेपणीं ही तो राज्यावर बसला तेव्हां आपल्या राज्याचा सर्व कारभार प्रधानावर सोंपवून आपण स्वच्छंदानें विलासांत काळ घालवूं लागला. त्याच्यामध्यें धार्मिकपणा हा एक विशेषगुण होता.

---

# रामराजा, दुसरा शाहूराजा, आणि प्रतापसिंह राजा,

## ह्यांचें वर्णन.

इ० स० १७४९ ह्या वर्षापासून इ० स० १८१८ ह्या वर्षापर्यंत.

रामराजा.

१. शाहूराजा मरण पावल्यानंतर त्याच्या आज्ञेप्रमाणें **पेशव्यांनीं रामराजाला** गादीवर बसविलें. परंतु तो व त्यामागून जे जे **साताऱ्याच्या** गादीवर बसले, ते सारे नांवाचे मात्र राजे

असत. **पेशवे** हे राजाप्रमाणें स्वतंत्रपणें सर्व राज्याचा कारभार करीत. **रामराजा** इ० स० १७७७ ह्या वर्षी मृत्यु पावला.

दुसरा शाहू राजा.

२. **रामराजा** निपुत्रिक होता; ह्मणून तो मेल्यानंतर **शिवाजी**च्या पणजाच्या वंशांतील कोणीएक पुरुष दत्तक देऊन त्याला **पेशवे** ह्यांनीं **सातारचे** गादीवर बसविलें, आणि त्याचें नांव **शाहू** महाराज ठेविलें. तो ही **रामराजा**प्रमाणेंच मरेपर्यंत परतंत्रपणांत काळ घालवून इ० स० १८०८ ह्या वर्षी मृत्यु पावला.

प्रतापसिंह व शाहाजी.

३. **शाहू** महाराज मेल्यानंतर त्याचा वडील पुत्र **प्रतापसिंह** हा **सातारचे** गादीवर बसला. तो ही सुमारें १० वर्षेपर्यंत **सातारचे** किल्ल्यांत **पेशव्यांचे** कैदेंत होता. पुढें इ० स० १८१८ ह्या वर्षी **इंग्रज** लोकांनीं **पेशव्यांचें** राज्य घेतलें, तेसमयीं **शिवाजी**च्या राज्यांतील कांहीं संस्थान त्यांनीं **प्रतापसिंहा**कडे ठेविलें होतें. परंतु इ० स० १८३९ ह्या वर्षी त्यावर फितुराचा दोष शाबीत झाल्यामुळें त्यास **इंग्रज** सरकारानें राज्यावरून काढिलें; आणि त्याचा धाकटा भाऊ **शाहाजी** ह्यास **सातारच्या** गादीवर बसविलें. तो **शाहाजी** इ० स० १८४८ ह्या वर्षी मृत्यु पावला. ह्या राजाला संतान नव्हतें, व त्याच्या वंशांत दुसरा कोणी ही राज्याचा अधिकारी नव्हता; म्हणून तें राज्य **इंग्रज** सरकारानें खालसा केलें. ह्याप्रमाणे **मराठी** राज्याचा शेवट झाला.

# प्रकरण दुसरें.

## पेशव्यांचें वर्णन.

## बाळाजी विश्वनाथ ह्याचें वर्णन.

इ० स० १७१४ ह्या वर्षापासून इ० स० १७२० ह्या वर्षापर्यंत.

पेशव्यांचें मूळस्थान व त्यांस अधिकार मिळण्याचीं कारणें.

१. **बाळाजी विश्वनाथ** हा पहिल्यानें, **कोंकणा**मध्यें हवसाणांत **श्रीवर्धन** म्हणून गांव आहे, तेथील कुळकरणी होता. शाहूराजाच्या कारकीर्दींत **मराठी** राज्याच्या वसुलाचें काम करणारा सेनापति **धनाजी जाधव** ह्यानें त्याला वसुलाचे कामावर कारकून नेमिलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं **धनाजी जाधव** मृत्यु पावला, तेव्हां त्याचें काम **बाळाजी विश्वनाथ**च पाहूं लागला. त्या कामांत त्याच्या आंगची विलक्षण अक्कल व पोंच **शाहूराजाच्या** नजरेस आल्यावरून त्याचें त्यावर प्रेम जडत चाललें. पुढें **कृष्णराव खटावकर** नांवाचा **मोंगलांच्या** आश्रयानें वाढलेला कोणी ब्राह्मण **शाहूच्या** राज्यांत उपद्रव करूं लागला, सबब त्याच्या पारिपत्याकरितां **शाहूनें बाळाजी विश्वनाथास** सैन्यासुद्धां पाठविलें. तेव्हां त्यानें **कृष्णरावाचा** अगदीं मोड केला. ह्याच संधीस **कोंकणामध्यें आंग्र्या** हा **शाहूच्या** मुलखावर स्वाऱ्या करीत होता; त्यावर शा-

हूनें आपला पेशवा बहिरोपंत पिंगळा ह्यास पाठविलें होतें. परंतु आंग्र्यानें त्याचा पराभव करून त्यास कैद केलें; सबब आंग्र्यांचा बंदोबस्त करून बहिरोपंताची सुटका करण्याकरितां शाहूनें बाळाजी विश्वनाथ ह्यास फौजेसुद्धां पाठविलें. तेव्हां बाळाजीनें आपल्या अकलेच्या बळानें शाहूराजाच्या इच्छेप्रमाणें तें काम शेवटास नेलें. त्या योगानें बाळाजी सातान्यास परत आल्यावर, शाहू फार संतुष्ट होऊन त्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि बहिरोपंत पिंगळे ह्याजकडून पेशवाईचा अधिकार काढून तो इ० स० १७१४ ह्या वर्षी बाळाजी विश्वनाथास दिला, व रामचंद्रपंत भानू ह्यास त्याचा फडनवीस केलें. नाना फडनवीस म्हणून जो पेशव्यांचा मुत्सद्दी पुढें प्रसिद्धीस आला, तो रामचंद्रपंताच्याच वंशांतला होता.

बाळाजीच्या कारकीर्दीत मराठ्यांनीं नवीन मिळविलेला मुलख.

२. बाळाजी विश्वनाथ पेशवाईचें काम चालवीत असतां, दिल्लीमध्यें असें झालें कीं, सय्यद म्हणून दोघे बंधु मुसलमान सरदार होते; ते व दिल्लीचा बादशाह फेरुकशेर ह्यांच्यामध्यें बेबनाव झाल्यामुळें त्या सरदारांनीं बादशाहाशीं लढण्याकरितां मराठ्यांपाशीं मदत मागितली; आणि तीबद्दल मराठ्यांस दक्षिणेंतील चौथाई, सरदेशमुखी, शिवाजीनें पूर्वी मिळविलेला दक्षिणेंतील सारा मुलूख, व आणखी कांहीं प्रांत, इतकें देण्याचें कबूल केलें. म्हणून शाहूच्या आज्ञेनें बाळाजी फौज घेऊन सय्यदांस मिळाला. तेव्हां

त्या **सय्यदांनीं** **फेरुकशेर** बादशाहास ठार मारिलें; आणि त्याच्या कुळांतील वाटेल त्यास तक्तावर बसवून ते स्वतः साऱ्या राज्याचा कारभार पाहूं लागले. नंतर **बाळाजी विश्वनाथ** त्यांपासून फौजेचा खर्च, व पूर्वी कबूल केलेले हक्क आणि मुलूख हे **मराठयांस** दिल्याबद्दल सनदा, इतकें घेऊन दक्षिणेंत परत आला.

बाळाजी विश्वनाथाचे कारकीर्दीत दक्षिणेंत स्वतंत्र राज्याची स्थापना.

३. **बाळाजी विश्वनाथाच्या** कारकीर्दींत **निजामउल्‌मुलुख** नामें सरदार **दिल्लीच्या** बादशाहाचे ताब्यांतील **गुजराथ** व **माळवा** ह्या प्रांतांचा मुख्य अधिकारी होता. त्यानें त्या **सय्यद** बंधूंचीं **माळव्यामध्यें** एक व **अवरंगाबादेस** एक अशीं दोन लष्करें होतीं, तीं जिंकून दक्षिणदेश बळकाविला. तेव्हां त्या दोघां बंधूंपैकीं धाकटा त्याच्या पारिपत्याकरितां येत असतां वाटेंत त्याला **निजामउल्‌मुलुखा**चे मित्रांनीं मारेकरी घालून ठार मारिलें; व थोरला ही त्यांनीं **दिल्लीच्या** बादशाहाकडून लढाईत धराविला; तेव्हां **निजामउल्‌मुलुखास** **दिल्लीच्या** बादशाहाची वजिरी मिळाली. परंतु पुढें बादशाहाशीं त्याचा बेबनाव झाल्यामुळें तो तें काम सोडून दक्षिणेंत आला, आणि तेथें स्वतंत्रपणें वागूं लागला. हा **निजामउल्‌मुलुख** **हैदराबाद** येथील हल्लींच्या **निजामशाही** घराण्याचा मूळपुरुष होय. हा व ह्याचे मागून जे पुरुष **हैदराबादे**चे गादीवर बसत आले आहेत, त्यांस **इंग्रज** लोक **निजाम** व **मराठे** लोक **नबाब** असें म्हणतात.

४. **बाळाजी विश्वनाथ दिल्लीहून** परत आल्यावर थोडक्याच महिन्यांनीं **सासवड** येथें इ० स० १७२० ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्यानें मरणाचे पूर्वीं सहा वर्षें **पेशवाईचें** काम केलें. त्याला दोन मुलगे होते. वडिलाचें नांव **बाजीराव** आणि धाकट्याचें नांव **चिमणाजी-आपा. बाळाजी विश्वनाथाच्या** मागें त्याचा वडील पुत्र **बाजीराव** ह्यास **शाहूराजानें पेशवाईचा** अधिकार दिला.

बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु व त्याची संतति.

---

## पहिला बाजीराव ह्याचें वर्णन.

इ० स० १७२० ह्या वर्षापासून इ० स० १७४० ह्या वर्षापर्यंत.

१. **बाळाजी विश्वनाथ** मरण पावल्यानंतर सुमारें सात महिन्यांनीं म्हणजे इ०स० १७२१ ह्या वर्षाच्या **एप्रील** महिन्याच्या सुमारास त्याचा वडील पुत्र **बाजीराव** ह्यास **पेशवाईचीं** वस्त्रें **शाहूराजानें** दिलीं.

त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

२. **पेशवाईचें** काम करूं लागल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें लष्करासुद्धां **खानदेशांत** जाऊन तेथील *मोकासपणाचा वसूल घेतला. इ० स० १७२४ ह्या वर्षीं **माळव्यांतून बाजीरावाच्या** पारिपत्या करितां कोणी **मुसलमान** सरदार आला होता, त्याशीं

माळव्यांत त्यानें केलेल्या स्वाऱ्या.

---

*एकंदर वसूलाच्या तीन चतुर्थांशास मोकासा म्हणत असत.

व बऱ्हाणपूरच्या सुभेदाराशीं युद्ध करून त्यांस त्यानें जिंकीलें. इ० स० १७२६–२७ ह्या वर्षी त्यानें माळव्यांत आणखी दोन स्वाऱ्या करून प्रत्येक वेळीं पुष्कळ द्रव्य लुटून आणिलें.

निजाम उल्मुलुखावर स्वारी.

३. ह्याप्रमाणें मराठ्यांचें प्राबल्य वाढत चालल्यामुळें हैदराबादचा निजामउल्मुलुख ह्याचे मनांत भीति उत्पन्न झाली; तेव्हां मराठ्यांचा नाश करावा ह्या हेतूनें त्यानें इ० स० १७२८ ह्या वर्षी शाहू व कोल्हापूरचा राजा संभाजी ह्यांच्यामध्यें तंटा उत्पन्न केला. हा त्याचा कावा बाजीरावास कळल्यावरून त्यानें शाहूच्या परवानगीनें त्यावर स्वारी केली, व त्याला अगदीं जेर करून सोडिलें; तेव्हां निजामउल्मुलुखानें मराठ्यांशीं तह केला.

त्रिंबकराव दाभाडा ह्याशीं बाजीरावाचें युद्ध.

४. निजामउल्मुलुखानें मराठ्यांशीं तह केला, तरी त्याच्या मनांत बाजीरावाविषयीं वांकडें राहिलेंच होतें. सबब त्यानें त्याचा सूड उगविण्याची एक युक्ति योजिली. ती अशी कीं, सेनापति त्रिंबकराव दाभाडा ह्याचें आणि बाजीरावाचें पूर्वी पासून वैर होतेंच; हल्लीं बाजीरावाची प्रतिष्ठा फार वाढत चालल्यामुळें तर, त्या उभयतांचें वैर जास्ती होऊन बाजीरावाच्या नाशाकरितां दाभाडा गुजराथेंत फौज जमा करूं लागला होता. ही संधि पाहून निजामउल्मुलुखानें त्याला बाजीरावाचा मोड करण्याचे कामांत भर देण्यासाठीं मदत करण्याचें कबूल केलें. तेव्हां दाभाडा

इ० स० १७३१ ह्या वर्षी ३५,००० फौज घेऊन, निजामापासून पुढें आपणास मदत मिळेल ह्या भरंवशावर, गुजराथेंतून दक्षिणेंत यावयास निघाला. हें वर्त्तमान बाजीरावास समजतांच तो ही पुण्याहून फौज घेऊन निघाला. नंतर त्या उभयतांची गांठ बडोदें आणि डुभई ह्यांच्यामध्यें पडून मोठी लढाई झाली; तींत बाजीरावाची फौज थोडी असतां ही त्यास जय मिळाला, व त्यानें त्रिंबकराव दाभाडा ह्यास ठार मारिलें. हें समजतांच निजामाला मोठी भीति पडून बाजीरावाचें सांत्वन करण्यास त्याला मोठे प्रयास पडले.

त्याची बुंदेलखंडांत स्वारी.

५. इ० स० १७३३ ह्या वर्षी बुंदेलखंडाचा राजा चतुरसाल ह्यावर माळव्यांतील मोंगलांच्या आधिकाऱ्यानें स्वारी केली. त्यावेळीं चतुरसालानें आपल्या रक्षणासाठीं बाजीरावाची मदत मागितली. तेसमयीं त्यानें तेथें जाऊन मोंगलांचा पराभव केला; आणि त्यांस बुंदेलखंडांतून हाकून लाविलें. तेव्हां चतुरसालानें त्याला झांशीजवळ सवादोन लक्षांचा मुलूख जाहगीर दिला, व पुढें त्यानें मरतेसमयीं आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा बाजीरावास दिला.

त्याची जंजिऱ्याच्या शिद्दीवर स्वारी.

६. इ० स० १७३५ ह्या वर्षी जंजिऱ्याचा मुख्य अधिकारी शिद्दीयाकूट म्हणून होता, तो मरून त्याच्या मुलांमध्यें तेथल्या गादीविषयीं तंटा लागला. तेव्हां त्या शिद्दीचा एक विश्वासूक सरदार याकुबखान नांवाचा होता, त्यानें त्याच्या मुलांपैकीं, शिद्दीरहिमान ह्याचा

ह्याचा पक्ष धरून त्याला गादीवर बसविण्याकारितां **शाहू**-पाशीं साहाय्य मागितलें. तेवेळीं **शाहूनें बाजीरावास** तिकडे जाण्यास हुकूम दिला. तेव्हां **बाजीरावानें जंजि-ऱ्यास** जाऊन **शिद्दी**चा जो मुलगा त्याशीं लढावयास आला त्याचा अगदीं मोड करून त्याला ठार मारिलें, आणि **रहिमान** ह्यास तेथील गादीवर बसविलें. ह्याबद्दल **रहिमान** ह्यानें **मराठ्यांस** आपल्या संस्थानापैकीं अकरा महालांचें अर्धें उत्पन्न देऊन, **रायगड**, **तळें**, **घोसाळें**, **उचितगड**, आणि **बिरवाडी** हे किल्ले दिले. ह्यांचा सर्व अधिकार **शाहूनें बाजीरावास** दिला.

त्याची दिल्लीवर स्वारी.

७. इ० स० १७३६ ह्या वर्षीं तो **जंजिऱ्याहून** परत आल्यावर **दिल्ली**च्या बादशाहापाशीं आपल्या पराक्रमाच्या जोरावर मुलूख व पैसा मनस्वी मागूं लागला, तेव्हां बादशाहाला राग येऊन त्यानें **बाजीरावाचें** पारिपत्य करण्याचा बेत केला. हें **बाजीरावास** समजतांच तो मोठा पराक्रम करून फौजेसहित थेट **दिल्ली**च्या दरवाज्यापर्यंत गेला आणि तेथें **मोंगलांचा** पराभव केल्यानंतर बहुतेक आपल्या इच्छेप्रमाणें तह करून घेऊन त्यानें त्यांशीं सल्ला केला. ह्यापूर्वीं त्यानें **गुजराथ** आणि **माळवा** ह्या दोन प्रांतांची चौथाई व सरदेशमुखी हे हक्क ही बादशाहापासून मिळविले होते.

पोर्तुगीज लोकांशीं मराठ्यांनीं केलेल्या लढाया.

८. इ० स० १७३७ ह्या वर्षीं **कोंकणांत पोर्तुगीज** लोक आणि **मानाजी आंग्र्या** ह्यांच्यामध्यें कांहीं तंटा उपस्थित झाल्यावरून ते लोक **आंग्र्यावर** हल्ला करण्याची तयारी करूं लागले. तेव्हां हे परके लोक आपला स्नेही **आंग्र्या** ह्याचा नाश करितात, असें पाहून **शाहूनें बाजीरावास** त्या लोकांच्या पारिपत्याकरितां पाठविलें. त्यानें **कोंकणांत** जाऊन **पोर्तुगीज** लोकांचा पुष्कळ ठिकाणीं पराभव केला, व त्यांचे **साष्टी** वगैरे पुष्कळ किल्ले घेतले. इ० स० १६६१ ह्या वर्षीं जेव्हां **पोर्तुगीज** लोकांनीं **मुंबई** बेट **इंग्रजांस** दिलें, तेव्हां **साष्टी** बेट हें **मुंबई** बेटाखालचेंच असें समजून **इंग्रजांनीं** तें ही **पोर्तुगीज** लोकांपाशीं मागितलें; परंतु ते म्हणाले कीं, **साष्टी** बेटाचा **मुंबई** बेटाशीं कांहीं संबंध नाहीं; सबब तें आम्ही देणार नाहीं. ह्यामुळें त्यावेळेस तें **इंग्रजांस** मिळालें नाहीं. परंतु तें घेण्याचा त्यांचा फार इरादा होता. पुढें वर सांगितल्याप्रमाणें **मराठ्यांनीं** तें बेट **पोर्तुगीज** लोकांपासून घेतलें, तेव्हां ती गोष्ट **इंग्रजांस** फार आवडली, कारण त्यांस असें वाटलें कीं, **मराठ्यांपासून** तें घेण्यास आपणांस फारसें कठीण पडणार नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें **बाजीराव पोर्तुगीज** लोकांस जिंकून त्यांजपासून घेतलेल्या मुलखाचा बंदोबस्त करीत आहे, इतक्यांत त्याला अशी खबर आली कीं, **दिल्लीच्या** दरबारांत त्याचें पारिपत्य करण्याचा विचार ठरून **निजामउल्मुलुखाची** त्या कामावर

नेमणूक झाली, व त्यानें ह्या कामाकरितां मोठें सैन्य जमा केलें. तेव्हां एकदम बाजीराव कोंकणांतील बहुतेक सैन्य घेऊन हिंदुस्थानांत गेला. ह्यामुळें पोर्तगीज लोकांस पुन: कोंकणांत उपद्रव करावयास फावलें; आणि त्यांनीं मराठयांशीं तंटे आरंभिले. शेवटीं इ० स० १७३९ ह्या वर्षीं वसईच्या किल्यास चिमणाजी आपानें घेरा घातला. तेसमयी उभय पक्षीं लढण्याच्या कसबाची पराकाष्ठा झाली. अखेरीस पोर्तुगीज लोकांस तो किल्ला सोडून जाणें भाग पडलें. ह्या लढाईत चिमणाजी आपा ह्यानें वर्णनीय पराक्रम केला, त्यामुळें तेव्हांपासून शूरपणाविषयीं त्याची कीर्ति फार झाली.

बाजीरावाची निजामउल्मुलखावर स्वारी.

९. इकडे बाजीराव सैन्यासुद्धां हिंदुस्थानांत जाऊन आपलें पारिपत्य करूं इच्छिणारा निजामउल्मुलख ह्याच्या पाठीस लागला; आणि त्याला मनस्वी जेर करून त्यानें असा तह करून घेतला कीं, सारा माळवा प्रांत व नर्मदा आणि चंबळा ह्या दोन नद्यांमधलि सगळा मुलूख, ह्यांचें पूर्ण आधिपत्य मराठ्यांस निजामउल्मुलखानें बादशाहाकडून देववावें; व हल्लींच्या स्वारीच्या खर्चाबद्दल पन्नास लाख रुपये त्यानें मराठ्यांस द्यावे. ह्याप्रमाणें विजयी होऊन बाजीराव दक्षिणेंत परत आला.

१०. **बाजीराव** **निजामउल्मुलुखाचा** पराभव करून परत आल्यावर फार दिवस झाले नाहींत, तोंच इ० स० १७३६ ह्या वर्षीं **इराणचा** बादशाह **नादिरशाहा** ह्यानें **दिल्लीवर** स्वारी करून तेथील बादशाहास कैद केलें, व तें शहर लुटून सुमारें सत्तर कोट रुपयांची लूट जमा केली, आणि त्या शहरांतील सुमारें दहा हजार लोक ठार मारिले. तो दक्षिणेंत **मराठ्यांवर** येणार अशी ही वदंता उठलेली **बाजीरावाच्या** कानावर आली, तेव्हां त्यानें सर्व **मराठे** जमा करून **दिल्लीकडे** जाण्याची तयारी केली. इतक्यांत त्याला अशी खबर लागली कीं, **नादिरशाहा** तेथील बादशाहास स्वसंतोषानें पुनः तक्तावर बसवून आपण **इराणास** निघून गेला; ह्यामुळें **बाजीरावाचा** तिकडे जाण्याचा बेत रहित झाला.

इराणच्या बादशाहाची हिंदुस्थानांत स्वारी.

११. ह्याप्रमाणें **बाजीराव** मोठमोठीं पराक्रमाचीं व ख्यातीचीं कृत्यें करून इ० स० १७४० ह्या वर्षीं **नर्मदेच्या** कांठीं मृत्यु पावला. त्यानें २० वर्षें **पेशवाईचें** काम केलें. त्याला तीन पुत्र होते. त्यांतून वडील पुत्र **बाळाजीपंत**, त्यास लोक फार करून **नानासाहेब** म्हणत असत. तोच बापाच्यामागें **पेशवाईचें** काम चालवूं लागला. दुसरा पुत्र **रघुनाथराव**; आणि तिसरा **जनार्दनपंत** म्हणून होता, तो लहान असतांच मरण पावला.

बाजीरावाचा मृत्यु व त्याची संतति.

१२. **बाजीराव** मोठा शूर असून राज्यकारभारामध्यें

त्याचे गुण.

ही अत्यंत निपुण होता. त्यानें एखादें काम एकदा शिरावर घेतलें म्हणजे किती ही प्रयास पडले तरी तें शेवटास नेण्याविषयीं तो झटत असे. ह्या त्याच्या गुणांवरून **शाहूराजानें** राज्याचा सारा कारभार त्याजकडे दिला होता. त्याचा धाकटा भाऊ **चिमणाजी आपा** हाही त्याप्रमाणेंच शाहणा व शूर असून लढायांच्यावगैरे कामांत फार उपयोगी पडत असे.

१३. सांप्रतकाळीं **हिंदुस्थानांत** जे प्रसिद्ध **मराठे**

बाजीरावाचे कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेले सांप्रतचे मराठे सरदार.

सरदार आहेत, त्यांपैकीं **होळकर**, **शिंदे**, व **गायकवाड**, हे तिघे **बाजीरावाच्या** कारकीर्दींत नांवारूपास आले. **मल्हारजी होळकर** हा **नीरानदीच्या** कांठीं **होळ** म्हणून खेडें आहे, तेथचा *चौगला असून **बाजीरावापाशीं** *शिलेदारीचें काम करीत असे. **बाजीरावानें माळव्यांत** पहिली स्वारी केली, त्यावेळीं **मल्हारजीनें** आपला पराक्रम गाजविला, तेणेंकरून तो पुढें उदयास आला. ह्याच स्वारींत प्रसिद्धीस आलेला दुसरा मनुष्य **राणोजी शिंदा**. ह्याचे पूर्वज फार दिवसांपासून **मोंगलांच्या** पदरीं सरदार होते; व त्यांपैकींच कोणा

---

* गांवच्या पाटलाच्या हाताखालीं एक दुय्यम असतो त्याला चौगुला म्हणत.

* आपल्या खर्चानें घोडा बाळगून सरकारी फौजेंत स्वाराची चाकरी करणारास शिलेदार म्हणत.

एकाची कन्या पाहून **अवरंगजेबानें** **शाहूराजाचें** लग्न केलें होतें. हे **शिंदे** मूळचे **साताऱ्याजवळ** एक **कन्हेरखेड** म्हणून गांव आहे तेथील पाटील होते. **राणोजी शिंदा** ह्यानें ही **मोंगलांच्या** दरबारांत मोठी आवरू मिळविली होती. परंतु दैवयोगानें त्यास गरीबी आल्यामुळें त्यानें **बाळाजी विश्वनाथाजवळ** *बारगिरीचें काम पतकरीलें होतें. पुढें कांहीं दिवसपर्यंत तो **बाजीरावाजवळ** हुजऱ्या होता. तेव्हां त्याचे उत्तम गुण पाहून **बाजीरावानें** त्याला मोठ्या योग्यतेस चढविलें. **बडोद्याच्या गाईकवाडांचा** मूळपुरुष **दमाजी**, हा सेनापति **खंडेराव दाभाडे** ह्याचे हाताखालीं एक हलक्या प्रतीचा सरदार होता; त्याचें शौर्य पाहून **शाहूराजानें** त्याला मोठा आधिकार देऊन **समशेर बहादर** हा किताब दिला. ह्या प्रमाणें तो योग्यतेस चढला. वर सांगितलेल्या सरदारांखेरीज **नागपूरच्या भोंसल्याच्या** पूर्वजांपैकीं **परसोजी भोंसला** म्हणून कोणी पुरुष **बाजीरावाच्या** वेळीं कांहींसा प्रसिद्धीस आला होता. पुढें त्याच्या वंशांतील **रघोजी भोंसला** म्हणून एक पुरुष शिकारीचे कामांत हुशार व धीट होता; ह्यामुळें **शाहूची** त्यावर मर्जी बसून त्यानें आपली मेहुणी **शिरक्यांची** कन्या त्यास देवविली आणि त्याला **सेनासाहेबसुभा** हा किताब देऊन **वऱ्हाडप्रांताची** सुभेदारी सांगितली. ह्याचे वंशज जे **नागपूरचे** राजे ह्यांचें आणि **साताऱचे** राजे, **शिवाजीचे** वंशज,

---

* फौजेंतील ज्या स्वारांस सरकारांतून घोडे मिळत, त्यांस बारगीर म्हणत.

ह्यांचें उपनांव एकच आहे खरें, तरी त्यांचा परस्परांशीं कांहीं एक संबंध नाहीं.

---

# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब

## पेशवा ह्याचें वर्णन.

इसवी सन १७४० ह्या वर्षापासून इ० स० १७६१ ह्या वर्षापर्यंत.

त्याला पेशवाईचीं वस्त्रें मिळतात; व तो आणि रघोजी भोंसला ह्याच्यामध्यें उत्पन्न झालेला कलह शाहूराजा मिटवितो.

१. पहिला **बाजीराव** मरण पावल्यानंतर **रघोजी भोंसला** ह्यानें, **बाबूजी नाईक बारामतीकर** नांवाचा कोणी फार संपन्न मुत्सद्दी होता, त्याला **पेशवाईचा** अधिकार मिळवून देण्याकरितां पुष्कळ खटपट केली. परंतु ती सिद्धीस न जातां **नानासाहेबालाच** तो आधीकार मीळाला. हें **रघोजीस** आवडलें नाहीं, व तो फार फौजबंद ही होता, त्यामुळें त्यानें **नानासाहेबाशीं** उघडपणें वैर मांडिलें. हें **नानासाहेबास** समजल्यावर, जेव्हां **रघोजीनें बंगालप्रांतावर** स्वारी केली, तेव्हां त्यानें **दिल्लीच्या** बादशाहाचा पक्ष धरून **रघोजीचा** लढाईंत पराभव केला. त्यामुळें तर उभयतांच्या मनांतील द्वेष वाढतच चालला; असें पाहून **शाहूराजानें** मध्यस्थी केली, आणि कांहीं ठराव करून दोघांचा तंटा मिटाविला. तो ठराव असा कीं, **बंगाल, बहार** व

**अयोध्या** ह्या तीन प्रांतांत जे **मराठ्यांचे** हक्क होते ते **रघोजीनें** घ्यावे; आणि **माळवाप्रांत** व **हिंदुस्थानच्या** पश्चिमभागांचे जे प्रांत त्यांतील **मराठ्यांचे** सारे हक्क **पेशवे** ह्यांनीं घ्यावे.

राज्याची व्यवस्था.

२. **नानासाहेबानें** आपला धाकटा भाऊ **रघुनाथराव** ह्याजकडे सर्व फौजेचें काम सांगून आपला चुलत भाऊ **सदाशिवराव भाऊ** ह्याजवर सर्व राजकीय काम सोंपाविलें होतें. हा **सदाशिवराव भाऊ** त्याचा बाप **चिमणाजी आपा** ह्याप्रमाणें शूर असून शाहणा होता. ह्याला लोक **भाऊसाहेब** म्हणत. ह्या **भाऊसाहेबानें** मुलखाचा बंदोबस्त करण्याकरितां **रामचंद्र बाबा** म्हणून एक **शेणवाई** होता तो आपल्या मदतीस घेतला होता. तो **शेणवाई** व **भाऊसाहेब** ह्या उभयतांनीं **शिवाजीच्या** वेळेपासून राज्यांत जी अव्यवस्था झाली होती, ती मोडून टाकून नवीन उत्तम नियम ठरविले, तेणेंकरून प्रजेस पुष्कळ प्रकारें सुख होऊं लागलें.

अहमद अबदाली ह्याची हिंदुस्थानावर स्वारी.

३. **नानासाहेबाचे** कारकीर्दींत **अहमदशाहा अबदाली** म्हणून **अफगाण** लोकांचा बादशाह त्यावेळीं **काबूल** व पश्चिम **इराण** ह्या देशांचें राज्य करीत असे; त्यानें इ० स० १७४८ ह्या वर्षी **हिंदुस्थानांत** स्वारी केली, व **पंजाबप्रांत** आपले हस्तगत करून **दिल्लीपर्यंत** चाल केली. तेव्हां **दिल्लीच्या** बादशाहानें आपला मुलगा **अमेदशाह** ह्याजबरोबर फौज

देऊन तो त्यावर पाठविला, त्यानें **अहमदशाहाला काबु-लापर्यंत** मागें हटविलें.

निजामउल्मुल्खाचा मृत्यु व त्याच्या राज्याची व्यवस्था.

४. त्याचवर्षी **निजामउल्मुल्ख** मृत्यु पावला. त्यावेळीं त्याचें वय १०४ वर्षांचें होतें असें म्हणतात. तो मेल्यानंतर त्याच्या पुत्रांमध्यें त्याच्या गादीविषयीं तंटा लागून **हैदराबाद**च्या राज्यांत सारी अव्यवस्था होऊन गेली. शेवटीं इ० स० १७५१ ह्या वर्षी त्याच्या मुलांपैकीं **सलाबत्‌जंग** म्हणून एक होता, त्याला गादी मिळाली. पुढें त्याला ही त्याचा भाऊ **निजामअली** ह्यानें इ० स० १७६२ ह्यावर्षी ठार मारून **हैदराबाद**ची गादी बळकाविली.

पुणें शहर पेशव्यांची राजधानी होणें.

५. **नानासाहेबा**च्या कारकीर्दीपूर्वी **सातार**च्या राजांचें स्वातंत्र्य कमी झालें नव्हतें. त्यामुळें तोंपर्यंत **सातारा** हीच **मराठी** राज्याची राजधानी होती. परंतु इ० स० १७४९ ह्या वर्षी **शाहूराजा** मरण पावल्यानंतर त्याच्याच सांगण्यावरून **नानासाहेबानें कोल्हापूर**च्या **ताराबाई**चा नातू **रामराजा** ह्यास नांवाचा मात्र राजा करून **सातार**च्या गादीवर बसविलें; आणि इ० स० १७५० ह्या वर्षी तेथील सर्व जाहगीरदार वगैरे **पुण्यास** बोलावून आणून तेथेंच त्यानें सारा राज्याचा कारभार चालविला. तेव्हांपासून **पुणें** शहर हेंच **मराठी** राज्याचें राज्य कारभाराचें मुख्य ठिकाण झालें.

६. इ० स० १७५३ ह्या वर्षीं **नानासाहेबानें** **कर्नाटकावर** स्वतः स्वारी करून तेथची व **श्रीरंगपट्टणाची** खंडणी स्वस्थपणें जमा केली; आणि **श्रीरंगपट्टणा** जवळचा **हुळी** नामक किल्ला हस्तगत करून घेऊन तो परत आला.

नाना साहेबाची कर्नाटकांत स्वारी.

७. **कर्नाटकांतून** **पुण्यास** परत आल्यावर **नानासाहेबानें** **रघुनाथराव** यास बरोबर सैन्य देऊन **गुजराथेंत** स्वारी करावयास पाठविलें. त्यानें **दमाजी गाईकवाड** ह्याचे मदतीनें इ० स० १७५१ ह्या वर्षीं **अमदाबादे**पर्यंत **गुजराथ** प्रांताची खंडणी घेतली. नंतर **अमदाबाद** किल्ला ही घेण्याविषयीं तो यत्न करूं लागला. तेव्हां मोठी लढाई होऊन शेवटीं किल्लेकऱ्यांनीं आपला निभाव लागत नाहीं असें पाहून तो किल्ला **रघुनाथरावा**च्या स्वाधीन केला. ह्याप्रमाणें **गुजराथेची** राजधानी **अमदाबाद** शहर हें इ० स० १७५५ ह्या वर्षीं पुरतेपणीं **मराठ्यांचे** ताब्यांत आलें. ह्या नंतर **रघुनाथराव** **अजमीर** प्रांतापर्यंत मुलखाची खंडणी घेऊन **पुण्यास** आला.

रघुनाथरावाची गुजराथेंत व अजमीर प्रांतांत स्वारी.

८. ह्याच सुमारास **आंग्र्यानें** समुद्रतीरीं फार *चाचेपणा आरंभिल्यामुळें **नानासाहेबानें** त्याच्या पारिपत्याकरीतां लढाऊ ग-

आंग्र्यावर स्वारी.

*गलबतें बाळगून समुद्रांत लुटारूपणा करणारास चाचेलोक म्हणतात, आणि त्यांच्या धंद्यास चाचेपणा म्हणतात.

लवतें तयार करून मुंबईतील इंग्रज लोकांच्या मदतीनें आंग्र्याचे समुद्रकिनाऱ्यावरचे विजयदुर्ग वगैरे बहुतेक किल्ले इ० स० १७५५ ह्या वर्षी घेतले; आणि इंग्रजांनीं मदत दिल्याबद्दल त्यांस बाणकोट व त्याच्या भोंवतालचे नऊ गांव दिले.

रघुनाथरावाची हिंदुस्थानांत दुसरी स्वारी.

९. आंग्र्याचा बंदोबस्त झाल्यावर नानासाहेबानें कर्नाटकांत पुनः एकदोन वेळां सैन्य पाठवून खंडणी जमा केली, आणि रघुनाथरावास आणखी एक वेळ हिंदुस्थानांत स्वारीवर पाठविलें. तो इ० स० १७५८ ह्या वर्षी पंजाब प्रांतांत शिरला. तेथें अफगाण लोक ( ह्यांसच मराठे लोक गिलचे म्हणतात. ) ह्यांचा बादशाह अहमद अबदाली ह्यानें आपला सुभेदार ठेविला होता. त्याला रघुनाथरावानें हांकून देऊन मुलतान व लाहोर एथें आपला अंमल बसविला. परंतु तेथें त्याला कांहीं वसूल उत्पन्न न होतां फौजेस खर्च मात्र फार लागूं लागला. ह्यास्तव मल्हारराव होळकर व दत्तोजी शिंदा ह्यांस फौजेसुद्धां वसूल करावयास तेथें ठेवून तो पुण्यास परत आला. ह्याप्रमाणें रघुनाथरावास कांहीं लाभ न होतां तो कर्ज मात्र करून आला. हें सदाशिवरावास न आवडल्यामुळें फौजेच्या खर्चाच्या बाबतींत त्या उभयतांचा तंटा लागला. तो तंटा मिटविण्याकरितां नानासाहेबानें असा ठराव केला कीं, रघुनाथरावानें पुण्यांत राहून मुलखी कामें करावीं व सदाशिवरावानें लष्कर घेऊन स्वारीस जावें.

हैदराबादच्या नबाब आणि सदाशिवराव ह्यांचें युद्ध होऊन मराठ्यांस मोठा लाभ होतो.

१०. ह्याप्रमाणें ठरल्यावर **सदाशिवरावभाऊनें** **हिंदुस्थानांत** स्वारी करण्याची तयारी केली. इतक्यांत अशी गोष्ट घडून आली कीं, त्यानें **हैदराबाद**करांच्या ताब्यांतील **अहमदनगर** शहर हें कांहीं युक्तीनें हस्तगत करून घेण्याचा यत्न पूर्वीपासून चालविला होता; तो सिद्धीस जाऊन तें शहर तेथच्या **मुसलमान** किल्लेदारानें दगलबाजीनें **भाऊसाहेबाच्या** कारकुनाचे स्वाधीन केलें. हें वर्तमान **हैदराबादचा** नबाब **सलाबतजंग** व त्याचा भाऊ **निजामअल्ली** ह्या उभयतांस कळतांच त्यांस मोठा राग आला; आणि **निजामशाही** बादशाहीची पुरातन राजधानी आपल्या हातांतून जाऊं द्यावयाची नाहीं, अशा निश्चयानें तें शहर परत घेण्याकरितां ते दोघे युद्धाची तयारी करून निघाले. ही खबर **भाऊसाहेबास** लागतांच **हिंदुस्थानांत** जाण्याचा बेत रहित करून तो लष्करासहित **हैदराबादेवर** जाण्यास निघाला. ह्याप्रमाणें दोन्ही फौजा एकमेकींवर येत असतां ***ऊदगीर** येथें त्यांची गांठ पडून मोठी लढाई झाली. तींत **मोगलांचा** अगदीं मोड झाला असें पाहून **निजामअल्लीनें** आपल्या अधिकाराचें मोर्तब **भाऊसाहेबाकडे** पाठविलें. हें करण्यांत त्याचा भावार्थ असा कीं, आतां तुमच्या इच्छेस येईल तशी तुम्ही तजवीज करा. हा भावार्थ समजून

* हा गांव निजामच्या राज्यांत मांझरा नदीच्या कांठीं आहे.

भाऊसाहेबानें त्याच्याशीं तह केला. ह्या तहाच्या योगानें मोंगलांपासून मराठ्यांस दवलताबाद, शिवनेरी, अशीरगड, आणि विजापूर हे किल्ले मिळून, अहमदनगर त्यांनीं घेतलें होतें तें त्यांजकडेसच राहावें असें ठरलें. ह्याखेरीज विजापूरप्रांत, बेदनूरप्रांताचा कांहीं भाग, आणि अवरंगाबादप्रांतापैकीं अवरंगाबाद शहर व हरसोळ आणि शितारा हे परगणे शिवाय करून तो सारा प्रांत, हेही मराठ्यांस मिळाले. सारांश, ह्याप्रसंगीं मराठ्यांस सुमारें बासष्ट लक्षांपेक्षां जास्त वसुलाचा मुलूख मिळाला. ही गोष्ट इ० स० १७६० ह्या वर्षीं घडली.

अहमद अबदालीची हिंदुस्थानांत मराठ्यांवर स्वारी.

११. रघुनाथरावानें मुलतान व लाहोर हे प्रांत घेतल्याचें वर्त्तमान अहमद अबदाली ह्यास समजतांच तो फार रागावून इ० स० १७६० ह्या वर्षीं मराठ्यांशीं युद्ध करण्याकरितां मोठ्या सैन्यासहित हिंदुस्थानांत आला. त्यानें प्रथम लाहोरामध्यें जे मराठ्यांचे लोक होते त्यांस हांकून लाविलें; आणि त्यांच्या मदतीस आलेल्या दत्ताजी शिंद्याचा पराभव करून त्याला ठार मारिलें. हें वर्त्तमान पेशव्यास कळतांच त्यानें सदाशिवरावभाऊ व आपला थोरला पुत्र विश्वासराव ह्यांबरोबर वीस हजार निवडक स्वार, आणि पायदळ व इब्राहीमखान गारदी ह्याचे कवाईत शिकलेले लोक आणि तोफखान्याचे लोक मिळून दहाहजार, असें सैन्य देऊन त्यांस हिंदुस्थानांत पाठविलें.

त्यांच्या सैन्यांत जे सरदार होते, त्यांत बळवंतराव गणपत मेहेंदळे, समशेर बहादुर ( हा पहिल्या बाजीरावास यवनीपासून झालेला पुत्र ), नारोशंकर ( ह्यालाच राजे बहादर ही पदवी होती), विठ्ठल शिवदेव विंचुरकर, व त्रिंबक सदाशिव पुरंदरे, हे मुख्य होते. ते चंबळा नदीच्या काठीं जाऊन पोहोंचताहेत तोंच पेशव्याच्या हुकुमावरून मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदा, दमाजी गाईकवाड, यशवंतराव पवार, आपाजीराव आठवले, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार आपापल्या सैन्यासहित त्यांस येऊन मिळाले. तेसमयीं भाऊसाहेबाच्या लष्कराचा सरंजाम अशा थाटाचा होता कीं, अवरंगजेब बादशाहाच्या वेळेपासून असा थाट कधीं कोणीं पाहिला नव्हता. ही मराठ्यांची हिंदुस्थानांतील तिसरी स्वारी.

मराठ्यांच्या व अफगाण लोकांच्या सैन्याची गणना.

ह्याप्रसंगीं मराठ्यांचें एकंदर सैन्य ५५००० स्वार व १५००० पायदळ, इतकें असून २०० तोफा होत्या. ह्याखेरीज *पेंढारी व बाजार बुणगे मिळून दोन लक्ष होते. अहमद अबदालीचें निवडक सैन्य ४९८०० स्वार व ३८००० पायदळ इतकें असून ७७ तोफा होत्या, व त्याखेरीज पुष्कळ स्वतंत्र शूर शिपाई त्याच्या मदतीस आले होते.

---

* लुटालूट करून निर्वाह करणारे लोक.

१२. **भाऊसाहेबानें** आपल्या साऱ्या सैन्यासहित पहिल्यानें **दिल्लीवर** जाऊन तें शहर हस्तगत केलें; परंतु पावसाळा आल्यामुळें तेथेंच त्याला छावणी करावी लागली. पुढें पाऊसकाळ संपल्यावर तो **दिल्लीचा** बंदोबस्त करून पुढें जाणार, इतक्यांत **अहमद अबदाली**नें त्याशीं सल्ला करण्याचा घाट घालून त्याला न कळतां आपलें सारें सैन्य **यमुने**च्या दक्षिणेस आणिलें. हें **अबदाली**चें कपटाचें कृत्य **भाऊसाहेबा**च्या सरदारांनीं त्याच्या कानावर घालून हिताच्या पुष्कळ युक्ति सूचविल्या; परंतु तो नुकताच **निजामअल्लीशीं** युद्ध करून जय पावल्यामुळें चढून गेला होता, तेणेंकरून त्याच्या बुद्धीस अंतर पडून त्यानें त्यांचें कांहींच ऐकिलें नाहीं. हेंच पुढें त्याच्या नाशाचें मुख्य कारण झालें. असो, ह्याप्रमाणें **गिलचे** लोक जवळ आले तेव्हां **मराठ्यां**चें लष्कर मागें **पानपता**कडे हटलें. तेथें **भाऊसाहेबानें** आपल्या लष्कराभोंवतीं खंदक खणून बंदोबस्तानें तळ दिला. **अबदालीनें**ही त्यांच्या जवळच तळ दिला; आणि शत्रूस आपल्या सैन्यांत येण्यास कठीण पडावें म्हणून सैन्याभोंवतीं मोठ मोठालीं झाडें तोडून पाडिलीं.

सदाशिवराव दिल्ली घेऊन पानपतास येतो.

१३. ह्याप्रमाणें **पानपत** येथें दोन्ही सैन्यांचे तळ पडले असतां, उभयपक्षांचे सरदार परस्परांस भेटत होते. त्यावरून पहिल्यानें त्यांचा सल्ला होईल असें दिसलें. परंतु **गोविंदपंत बुंदेले** ह्यास **गिलच्यांच्या** धान्यादि-

पानपत एथील लढाई.

कांच्या नाश करण्याकरितां **भाऊसाहेबानें** पाठविलें असतां, त्याची आणि **गिलच्यांच्या** एका सरदाराची मोठी चकमक झडून **गोविंदपंत** ठार मेला. त्यामुळें तो सल्याचा बेत विसकटला. तेव्हां उभयपक्षीं हळू हळू युद्धांस आरंभ झाला, तरी इ० स० १७६० ह्या वर्षाच्या दिसेंबर महिन्याच्या २३ व्या तारखेपर्यंत तें फारसें वाढलें नव्हतें. परंतु त्या दिवशीं **अबदालीचा** वजीर कांहीं स्वार बरोबर घेऊन जवळच एका मशिदीकडे जात होता, हें पाहून **मराठ्यांनीं** एकाएकीं त्यावर हल्ला केला. तेव्हां तो हातीं लागण्याचा बेत आला होता, परंतु त्या चकमकींत **मराठ्यांकडील बळवंतराव मेहेंदळा** पडला. त्यामुळें **भाऊसाहेबास** फार दुःख होऊन तो त्याचें प्रेत घेऊन परत आला. त्यामुळें त्या वजिराला पळून जाण्यास संधि सांपडून तो हातचा गेला. त्या दिवसापासून उभयपक्षीं टोळ्या टोळ्यांचीं युद्धें चालू झालीं. शेवटीं **मराठ्यांच्या** लष्करास धान्यादिकाचा फार तोटा पडून उपाशी मरण्याची वेळ आल्यामुळें, अन्नावांचून मरावें त्यापेक्षां लढाईंत मरणें बरें, असा त्या सर्वांनीं निश्चय करून इ० स० १७६१ ह्या वर्षाच्या जानुआरीच्या ७ व्या तारखेस एकदम शत्रूवर चाल केली. ते समयीं **मराठ्यांकडील इब्राहिमखान गारदी** व **दमाजी गायकवाड** हे अघाडीस होते; त्यांनीं आपणा समोरच्या **रोहिल्यांवर** इतक्या वेगानें चाल केली कीं, त्यांची त्यांनीं अगदीं दाणादाण करून सोडिली. सैन्याचे मध्यभागीं **भाऊसाहेब** होता, त्यानेंही **अबदालीच्या** वजिरावर चाल

करून त्याच्या स्वारांची फळी फोडून टाकिली. तेव्हां दोन्ही सैन्यें अगदीं हातघाईवर येऊन इतकी गर्दी होऊन गेली कीं, तिच्या योगानें धुरळा मनस्वी उडून कांहीं दिसेनासें झालें; त्यामुळें स्वकीय किंवा परकीय हें उभयपक्षींच्या लोकांस समजेना. ते आपपाल्या लोकांसच मारण्याच्या बेतांत आले. त्यावेळीं **मराठे** लोक हरहर **महादेव** म्हणत, व **मुसलमान** दीन दीन म्हणत, ह्या खुणेनें मात्र ते एकमेकांस ओळखीत. शेवटीं **अफगाण** लोक जरा मागें हटूं लागले, असें पाहतांच **अबदाली**च्या **वजिरानें** त्यांस धीर देऊन मागें फिरविलें; आणि दुसरी दहा हजार स्वारांची टोळी घेऊन **मराठ्यां**वर मोठ्या वेगानें हल्ला केला. तेव्हां पुन: गर्दी होऊन हातघाई सुरू झाली. ह्याप्रमाणें अडीच प्रहर दिवसपर्यंत चालल्यावर **विश्वासरावास** असाध्य जखम लागली; हें वर्त्तमान **भाऊसाहेबास** कळतांच तो आपल्या हत्ती वरून उतरला आणि घोड्यावर बसून युद्धाच्या गर्दींत शिरला; व थोडक्याच वेळांत दिसेनासा झाला. हा प्रकार पाहून **होळकर** व **दमाजी गाईकवाड** युद्ध सोडून निघाले; तेव्हां इतर **मराठ्यांचें** ही अवसान सुटून ते सारे चोंहोंकडे पळूं लागले. कितीएक खंदकाकडे पळाले, ते एकमेकांवर पडून मेले. कितीएक लोक आपल्या मुलां माणसांसुद्धां **पानपत** गांवांत शिरले, त्यामुळें तेथें मोठी गर्दी होऊन गेली. तेव्हां **गिलच्यांनीं** त्या गांवास वेढा घालून दुसरे दिवशीं त्यांतले सर्व लोक पकडले. त्यांपैकीं सारे पुरुष ठार मारून बायकांस आपल्या दासी व मुलांस आपले गुलाम करून ठेविलें. **मराठे** लोक सांपड-

ले कीं, त्यांना ओळीनें ऊभे करून सर्वांची डोकीं एकदम कापावीं, आणि त्या डोक्यांचे ढिगांचे ढीग आपल्या डेऱ्यांपुढें रचून ठेवावे; अशा प्रकारें अत्यंत दुष्टपणाचें व मनुष्यजातीस बट्टा आणणारें कर्म करून **गिलचे** लोक आपल्या मुलखीं निघून गेले.

पानपतचे लढाईंत मेलेले व परत आलेले मराठ्यांचे सरदार वगैरे.

१४. **विश्वासराव** युद्धांत पडल्याचें वर लिहिलेंच आहे. **भाऊसाहेब** युद्धाच्या गर्दीत शिरला तो पुनः सांपडला नाहीं. **गोविंदपंत बुंदेले** आणि **बळवंतराव मेहेंदळे** हे पूर्वींच रणांत पडले होते. **जनकोजी शिंदा** आणि **इब्राहीमखान** ह्यांस शत्रूनें धरून ठार मारिलें. **मल्हारराव होळकर** व **दमाजी गाईकवाड** हे पहिल्यानेंच पळून आले. तसेच **विंचुरकर** व **राजेबाहादर** हे **दिल्लीच्या** बंदोबस्ताकरितां ठेविले होते ते स्वस्थपणें स्वदेशीं परत आले. सारांश, मराठ्यांच्या सैन्यांपैकीं सुमारें चतुर्थांश लोक मात्र माघारे आले. बाकीचीं सुमारें दोन लक्ष मनुष्यें ठार मेलीं. त्यांच्या शोकानें संपूर्ण **महाराष्ट्र** देश व्यापून गेला.

नानासाहेबाचा मृत्यु.

१५. हें पराभवाचें वर्तमान **पुणें** मुक्कामीं **नानासाहेबास** कांहींसें समजतांच तो आपलें खाजगीचें सैन्य व **जानोजी भोसल्याचें** दहा हजार सैन्य ह्यां सहित आपल्या लोकांच्या मदतीकरितां निघाला. तो जानुआरीच्या १५ व्या तारखेचे सुमारास **नर्मदेच्या** पलीकडे

जात असतां **अमदाबाद**च्या कोणी सावकाराचा जासूद तिकडून आलेला त्याच्या सैन्यास भेटला. त्यानें **मराठ्यांचा** अगदीं मोड झाल्याची पक्की बातमी सांगितली. त्या जासुदाजवळच एक पत्र सांपडलें, त्यांत सांकेतिक भाषेनें लिहिलें होतें कीं, दोन मोतीं गळून गेलीं, सत्तावीस मोहरा सांडल्या, आणि रूपये व खुर्दा किती हरवला ह्याचीतर संख्याच लागत नाहीं. ह्या मजकुरावरून **नानासाहेबास** लढाईच्या परिणामाचें बहुतेक अनुमान झालें. इतक्यांत परत आलेल्या लोकांपैकीं **बाळाजी पंत फडनवीस** (तोच पुढें **नाना फडनवीस** ह्या नांवानें प्रसिद्ध झाला) त्याला पहिल्यानें भेटला; आणि त्यानें **नानासाहेबास** लढाईचें कच्चें वर्त्तमान सांगितलें. तेव्हां तो अत्यंत दुःखी होऊन **पुण्यास** परत आला. त्या-वेळेपासून दुःखामुळें तो एकसारखा झुरत चालला. शेवटीं **पुण्याज**वळ त्यानें बांधविलेल्या पर्वतीच्या देवालयांत इ० स० १७६१ ह्या वर्षी जून महिन्याच्या अखेरीस तो मृत्यु पावला. त्यानें २१ वर्षें पेशवाईचा अधिकार चालविला.

नानासाहेबाचा स्वभाव व त्याच्या कारकीर्दीत मराठी राज्याची स्थिति.

१६. **नानासाहेब** राजकीय कामांत चतुर होता; परंतु बराच कपटी असे. त्याच्या कारकीर्दींत **पानपत**च्या लढाईच्या पूर्वी **मराठे** लोकांच्या प्राबल्याची अगदीं सीमा झाली होती. त्यांची सत्ता इतकी वाढली कीं, **दिल्ली**च्या दरबारीं ही कांहीं राज्यप्रकरणीं उलटा पालट

होऊं लागल्यास, ती मराठे लोकांच्या साह्यावांचून होई-नाशी झाली. ही गोष्ट केवळ त्याच्याच चातुर्यामुळें झाली असें म्हणतां येत नाहीं. त्याच्या वडिलांनीं जो पराक्रम करून ठेविला होता, तो त्याच्या कारकीर्दीत फळास आला असें म्हटलें पाहिजे. पानपतच्या लढाईत पराभव झाल्यामुळें मराठे लोकांची जी दुर्दशा झाली, ती पासून त्यांना पुन्हा पूर्व स्थितीवर येण्यास पुष्कळ वर्षे लागलीं.

नानासाहेब स्वत: चैनबाज असून त्याला कामकरण्याचा कंटाळा असे; तथापि त्याचा धाकटा भाऊ रघुनाथराव व चुलत भाऊ सदाशिवराव हे आप आपल्या कामांत फार हुंशार असून मोठे मेहनती असत, त्यामुळें पेशव्यांचें घराणें फार बलिष्ठ होऊन प्रजा ही सुख पावूं लागली.

---

# पहिला (थोरला) माधवराव साहेब ह्याचें वर्णन.

इ० स० १७६१ ह्या वर्षापासून इ०स० १७७२ ह्या वर्षापर्यंत.

त्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

१. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब मरण पावल्यानंतर त्याचा वडील पुत्र माधवराव ह्यास इ० स० १७६१ ह्या वर्षी सप्टंबर महिन्याचे अखेरीस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्या वेळीं त्याचें वय सत्रा वर्षांचें होतें.

२. **माधवराव** पुरा वयांत आला नव्हता, म्हणून आरंभीं कांहीं दिवस त्याचा चुलता **रघुनाथराव** हाच पेशवाईचा कारभार करीत होता. रघुनाथराव हा जरी राजकीय कामाच्या अगदीं उपयोगी नव्हता, तरी तो मोठा शूर असून त्या वेळेस **मुसलमानांशीं** वगैरे **मराठ्यांनीं** ज्या लढाया केल्या त्यांत पुढारी होऊन त्यानें बहुत प्रसंगीं जय मिळविला होता; तेणेंकरून, व त्याची बायको **आनंदीबाई** हिनें ही त्याच्या मनांत भरून दिल्यावरून, राज्याचा अर्धा हिस्सा आपणास असावा अशी तो इच्छा दर्शवूं लागला. ह्यामुळें त्याचें आणि **माधवराव** ह्याचें वैमनस्य पडलें; म्हणून **माधवरावानें** तो व त्याचा स्नेही **सखारामबापू** (हा एक फार शहाणा मनुष्य होता) ह्या उभयतांस कारभारावरून दूर केलें. तेव्हां **रघुनाथराव मोंगलांकडे** जाऊन त्यांच्या आश्रयानें **माधवरावाशीं** युद्ध करावयास आला; तथापि त्याशीं युद्ध न करितां **माधवरावानें** मोठ्या चातुर्यानें प्रथम आर्जव करून त्यास वश करून घेतलें; परंतु पुढें तो स्थिरला, तेव्हां **माधवरावानें** संधि साधून त्यावर हल्ला केला; आणि त्याच्या फौजेचा अगदीं मोड करून त्यास **पुण्यामध्यें** बंदोबस्तांत ठेविलें.

माधवरावाचें रघुनाथरावाशीं वैमनस्य.

३. ह्याप्रमाणें **रघुनाथरावाचा** बंदोबस्त केल्यावर **माधवरावानें त्रिंबकराव मामा** ह्या नांवाचा त्याचा एक संबंधी होता त्यास मुख्य कारभारी नेमून राज्याची व्यवस्था चालविली; **माधवरावानें** प्रजेच्या रक्षणाक-

तो राज्याची व्यवस्था करितो.

रितां उत्तम कायदे केले; **रामशास्त्री परभुणे** ह्या नांवाचा एक महाविद्वान, न्यायकरण्याचे कामीं मोठा चतुर व अत्यंत नि:पक्षपाती ब्राम्हण होता, त्यास त्यानें न्याय करण्याचे कामावर नेमिलें; आणि गरीब लोकांची दाद लवकर लागावी व त्यांस सुख व्हावें म्हणून **माधवरावानें** पुष्कळ तजविजी केल्या. त्याच्या कारभाऱ्यांमध्यें **बाळाजीपंत भानू** म्हणून एक गृहस्थ फडनविशीचे कामावर होता. तो आपल्या अकलेच्या जोरावर पुढें फार प्रसिद्धीस आला. त्यास लोक **नानाफडणवीस** असें म्हणत. त्याजकडे हें काम **बाळाजी बाजीरावाच्या** वेळेपासून होतें.

हैदर अल्ली ह्याशीं मराठ्यांच्या लढाया.

४. **माधवरावाचे** कारकीर्दींत **म्हैसुरप्रांतामध्यें हैदरअल्ली** ह्या नांवाचा **मुसलमान** एका स्वतंत्र राज्याची स्थापना करून **मराठ्यांशीं** लढाया करूं लागला. परंतु **माधवरावाचें** शौर्य व चातुर्य ह्यांपुढें **हैदराचें** कांहीं न चालतां बहुतेक लढायांत त्याचा पराभव होऊन त्याला **मराठ्यांस** खंडणी देणें भाग पडलें.

माधवरावाचा मृत्यु.

५. ह्याप्रमाणें **माधवरावसाहेब** सर्वत्र विजयी होऊन रात्रंदिवस प्रजेच्या सुखासाठीं यत्न करीत असतां, **मराठे** लोकांच्या दुर्दैवामुळें त्यास अकालीं मृत्यूनें गांठलें. इ० स० १७७२ ह्या वर्षी तो नोवेंबर महिन्याचे अठरावे तारखेस **थेऊर** येथें मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचें वय २८ वर्षांचें होतें. त्याला मूल मुलींच नव्हतें. त्याची बायको **रमाबाई** ही त्याबरोबर सती गेली.

६. **माधवरावाच्या** कारकीर्दीचें जें वर संक्षिप्त वर्णन केलें आहे, त्यावरून त्याच्या शौर्याचें अनुमान होईलच; परंतु राजनीतींत ही तो फार चतुर असून, प्रामाणिकपणा, धैर्य इत्यादि पुष्कळ गुण त्याच्या आंगीं वसत होते. गरीब लोकांच्या सुखाकडे त्याचें किती लक्ष्य होतें हें पुढील गोष्टीवरून सहज समजेल. त्या वेळेस गांवांतून गरीब लोकांस जबरदस्तीनें बेगारीस धरून नेण्याची चाल फार दिवस पडली होती, ती त्यानें अगदीं मोडून टाकिली होती; हें माहीत असतांही **वसईचा** सुभेदार **विसाजीपंत** ह्यानें आपले कांहीं जिन्नस बेगारी धरून त्यांजकडून नेवविले. हें वर्त्तमान **माधवरावसाहेबास** कळतांच त्यानें त्या सर्व जिनसांची जप्ती केली आणि बेगारी लोकांचे रोज चुकवून दिले. सारांश, तो प्रजेचें पालनकरणारा इतका उत्तम होता कीं, त्याचें अल्पवयांतील मरण **मराठे** लोकांस फार दुःखाचें कारण झालें.

त्याचा स्वभाव.

७. **माधवराव** मृत्यु पावला त्या वेळीं **शिंदे**, **होळकर**, **गाईकवाड**, व दुसरे लहान लहान सरदार ह्यांच्या मुलखांसुद्धां **मराठी** राज्याचा वसूल दहा कोटी रुपये होता असें म्हणत, परंतु वास्तविक सुमारें सात कोटी रुपये होता.

त्याचे मरणसमयीं मराठी राज्याचा वसूल.

# नारायणराव आणि रघुनाथराव ऊर्फ राघोबा दादा ह्यांचें वर्णन.

इ० स० १७७२ ह्या वर्षापासून इ० स० १७७४ ह्या वर्षापर्यंत.

नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

१. थोरला **माधवराव** मरण पावल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ **नारायणराव** हा पेशवाईचे गादीवर बसला. **सातारचे** राजानें त्यास **पेशवाईचीं** वस्त्रें देते समयीं त्याच्या नांवास कारभारी असें नवेंच पद जोडिलें. ह्या वेळीं **नारायणरावाचें** वय सुमारें १७ वर्षांचें होतें.

त्याचें आणि रघुनाथरावाचें वैमनस्य.

२. **माधवरावानें** मरतेसमयीं **रघुनाथराव** आणि **सखाराम बापू** ह्यांस जवळ बोलावून व त्यांचे अधिकार त्यांजकडे देऊन मोठ्या आर्जवानें त्यांस सांगितलें होतें कीं, तुम्ही सर्व कारभारी एकचित्त होऊन **नारायणरावाचा** सांभाळ करा. **माधवरावाच्या** ह्या सांगण्यावरून, **नारायणरावास** पेशवाईचें काम मिळाल्यावर, कांहीं दिवसपर्यंत त्या चुलत्या पुतण्यांचें सख्य होतें. परंतु **रघुनाथरावाची** बायको **आनंदीबाई** व **नारायणरावाची** आई **गोपिकाबाई** ह्या दोघींचीं मनें मिळेनात; त्यामुळें त्या दोघांमध्यें द्वेष उत्पन्न झाला. तेव्हां **नारायणरावानें रघुनाथरावास पुण्यामध्यें** आपल्या वाड्यांत एका खोलीमध्यें बंदोबस्तांत ठेविलें, आणि **बजाबा**

पुरंदरे नानाफडनवीस, व हरीपंत फडके ह्यांचे हातून राज्याचा कारभार चालविला.

मारेकऱ्यांचे हातून त्याचा मृत्यु.

३. नारायणरावानें पेशवाईचा कारभार सुमारें आठ महिने चालविल्यावर इ० सन १७७३ ह्या वर्षीं आगष्ट महिन्यांत एके दिवशीं कांहीं गारदी लोक, त्यांचा पगार थकला होता तो मागण्याचे निमित्तानें, त्याचे वाड्यांत शिरून दांडगाई करूं लागले. त्यांपैकीं सुमेरसिंग नांवाचा एक गारदी नारायणरावास मारण्याकरितां त्याच्या अंगावर धांवून गेला. हें पाहतांच नारायणराव भिऊन रघुनाथरावापाशीं गेला. तेव्हां त्यास न मारण्याविषयीं रघूनाथरावानें त्या गारद्याची पुष्कळ विनवणी केली; परंतु ती न ऐकतां तो व रघुनाथरावाचा एक हुजऱ्या ह्या उभयतांनीं नारायणराव आणि त्याचा हुजऱ्या ह्यांस ठार मारिलें.

रघुनाथरावास पेशवाईचा अधिकार मिळतो.

४. हें घोर कृत्य रघुनाथरावानें करविलें असावें, असा सर्व कारभारी लोकांस संशय आला. परंतु पहिल्यानें निश्चय होईना; म्हणून रघुनाथरावाच्या नशिबानें प्राप्त झालेली पेशवाईची पदवी त्यानें भोगावी असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें तो पेशवाईचा कारभार करूं लागला. पुढें रामशास्त्री ह्यानें सुमारें दीड महिना त्या कृत्याची बारकाईनें चौकशी केली, तीवरून त्याची पक्की खातरी झाली कीं, हें कृत्य रघुनाथरावानेंच करविलें. मग त्यानें त्या प्रकरणीं त्यास

समक्ष विचारिलें; तेव्हां त्यानें कबूल केलें कीं, **नारायणराव** धरावा असें मीं **गारदी** ह्यांस पत्र दिलें होतें खरें; परंतु धच्या ठिकाणीं मा कोणीं लिहिला हें मला माहीत नाहीं. तेव्हां हें कृत्य **आनंदीबाईचेंच** असावें असें सर्वांस वाटलें. ह्या सर्व कारणांनीं कांहीं कारभारी लोकांचे मनांत **रघुनाथरावाविषयीं** फारच द्वेष उत्पन्न झाला.

रघुनाथरावास पदच्युत करण्याविषयीं यत्न.

९. पुढें कांहीं दिवसांनीं **रघुनाथराव कर्नाटकामध्यें हैदराशीं** युद्ध करण्याचे मसलतींत गुंतला असतां, त्याचे प्रतिस्पर्धी **नाना फडनवीस, सखाराम बापू**, व दुसरे कांहीं कारभारी, ह्यांनीं त्याला पदच्युत करण्याची एक युक्ति योजिली. ती अशी; **नारायणरावास** मारिलें तेव्हां त्याची बायको **गंगाबाई** गरोदर होती; तिला त्या कारभाऱ्यांनीं **रघुनाथरावाच्या** भयानें **पुरंदरावर** नेऊन ठेविलें; आणि त्याच्या पक्षाचे सर्व लोक कैद करून **गंगाबाईच्या** नांवानें राज्यकारभार चालविला. तेथें थोडक्या दिवसांनीं तिला पुत्र झाला; तेव्हां **रघुनाथरावाच्या** प्रतिपक्ष्यांनीं त्याचें नांव **माधवराव**. असें ठेवून त्याच्या नांवाची चोहींकडे द्वाही फिरविली. ते वेळीं **नाना फडनवीस** संपूर्ण राज्याचा कारभार चालवीत होता.

# धाकटा माधवराव साहेब ह्यांचें वर्णन.

इ० स० १७७४ ह्या वर्षापासून इ० स० १७९६ ह्या वर्षापर्यंत.

माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

१. **माधवराव नारायण** इ० स० १७७४ ह्या वर्षी एप्रिल महिन्यांत जन्मला. त्यानंतर चाळीसावे दिवशीं त्यास **साताऱ्याहून पेशवाईचीं** वस्त्रें आलीं; म्हणून त्याचे जन्मापासूनच त्याची कारकीर्द सुरू झाली असें म्हटलें पाहिजे. त्याला लोक **सवाई माधवराव** असें म्हणत.

रघुनाथराव इंग्रजापाशीं मदत मागतो.

२. **सवाई माधवरावाला पेशवाईचीं** वस्त्रें मिळालीं हें ऐकून **रघुनाथरावानें** तो अधिकार आपणास मिळावा ह्मणून पुनः प्रयत्न चालविला. तो असा, त्यावेळीं **इंग्रजसरकारचीं** ठाणीं **कलकत्ता, मुंबई,** आणि **मद्रास** ह्या तीन ठिकाणीं होतीं; त्यांपैकीं **मुंबईच्या** मुख्य इंग्रज अधिकाऱ्यांशीं त्यानें असें बोलणें लाविलें कीं, जर तुम्ही मला पुन्हा **पेशवाईचे** गादीवर बसवाल, तर **साष्टीबेट, वसईगांव,** व **गुजराथेंतील** कांहीं प्रांत हीं मी तुम्हांस देईन. हें **साष्टीबेट** पूर्वी **पोर्तुगीज** लोकांच्या ताब्यांत असून **मराठ्यांनीं** बलात्कारानें त्यांजपासून घेतलें होतें; तें आपणास मिळावें अशी **मुंबईसरकारास** फार इच्छा होतीच. त्यामुळें ते **रघुनाथरावाचें** बोलणें कबूल करण्याच्या बेतांत होते. परंतु **रघुनाथरावानें** पुनः बोलणें फिरवून **साष्टीबेट** देण्याचें नाकबूल केलें; आणि तो

दुसरें कांहीं बोलणें लावणार, इतक्यांत साष्टीवगैरे संस्थानें हिंदु लोकांपासून माघारीं घेण्याकरितां पोर्तुगीज लोकांच्या बादशाहाकडून गोंव्यास फौज येऊन पोहोंचली, अशी वार्ता उठली. तेव्हां मुंबईसरकारानें रघुनाथरावाच्या अनुमोदनाची वाट न पाहतां त्वरा करून तें बेट तत्काळ आपल्या हस्तगत करून घेतलें.

इंग्रज लोकांनीं रघुनाथरावाचा पक्ष सोडण्यास कारणें झालीं तीं.

३. मुंबईसरकारानें साष्टीबेट घेतल्यानंतर रघुनाथरावानें पुनः त्याजपाशीं मदत मागण्याकरितां बोलणें लाविलें. तेव्हां उभयतांचा कांहीं ठराव होऊन मुंबईसरकारानें किटिङ् साहेब फौजे सहित रघुनाथरावाचे मदतीस पाठविला. ह्याच वेळेपासून मराठे व इंग्रज ह्यांच्यामध्यें लढायांची सुरवात झाली. रघुनाथरावास पेशवाईचे गादीवर बसविण्याचा मुंबईसरकारचा उद्देश सिद्धीस जातो, असा त्या वेळच्या लढायांवरून रंगही दिसूं लागला. इतक्यांत एक विघ्न उत्पन्न झालें. तें असें कीं, मुंबई, मद्रास, आणि इतर कांहीं ठिकाणें येथें जीं इंग्रज लोकांचीं ठाणीं होतीं, त्या सर्वांवर कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल व त्याचे मंत्री ह्यांची देखरेख असावी, असा विलायतेहून ठराव होऊन आला. तेव्हां मुंबईसरकारानें हत्या करणारा रघुनाथराव ह्यास मदत केली, ही गोष्ट कलकत्तासरकारास नापसंत होऊन, त्याच्या कुमकेस पाठविलेलें आपलें लष्कर परत बोलाविण्याविषयीं त्यांनीं मुंबईसरकारास लिहिलें;

आणि पेशव्यांशीं स्नेह करण्याच्या उद्देशानें पुण्यास आपला वकील पाठविला. तेव्हां पुरंदर मुक्कामीं पेशवे आणि इंग्रज ह्यांचा असा तह झाला कीं, साष्टी इंग्रजांकडेसच राहावी; व त्यांनीं इतःपर रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारूं नये; आणि रघुनाथरावास हा तह मान्य होईल तर त्यानें खर्चाकरितां दरमहा पंचवीस हजार रुपये घेऊन कोंपरगांवीं स्वस्थ राहावें. परंतु रघुनाथरावास तो तहांतली आट न पटल्यामुळें तो मुंबईस येऊन राहिला. तेथें इंग्रजांनीं त्याला दरमहा दहा हजार रुपये देऊन आपल्या आश्रयास ठेविलें.

सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा मनुष्य.

४. पुणेंप्रांतीं वर लिहिल्याप्रमाणें रघुनाथरावाच्या योगानें धामधूम चालली असतां, कोंकणामध्यें एक विघ्न उत्पन्न झालें. तें असें. पानपतची लढाई झाल्यानंतर सुमारें आठ नऊ वर्षांनीं म्हणजे थोरला माधवराव ह्याचे कारकीर्दींत सदोबा ह्या नांवाचा कोणीएक ब्राह्मण सदाशिवराव भाऊ तो मीच असें प्रसिद्ध करूं लागला. तेव्हां माधवरावानें त्याची पुरी चौकशी करून तो खोटा ठरल्यामुळें त्यास कैदेंत ठेविलें होतें. तो ह्या वेळीं रत्नागिरी येथें कैदेंत असतां तेथील सुभेदारानें, पुण्यांतील कारभारी लोकांत वैमनस्यें पडलेलीं पाहून, ह्या प्रसंगीं त्याला सोडिलें असतां आपणास मोठा लाभ होईल, अशा बुद्धीनें त्याला बंदींतून मुक्त केलें; आणि हाच खरा सदाशिवराव भाऊ असें लोकांस सांगून त्याला वीस हजार फौज मिळवून

दिली. तेव्हां त्यानें कोंकणांतील सुमारें वीस किल्ले घेतले; व घाटावरील राजमाची किल्ला घेतला. ह्यामुळें मुंबईसरकारास ही तो खरा सदाशिवराव भाऊ वाटून त्यांनीं त्याकडे वकील पाठविला, आणि त्याचा मोठा सन्मान केला. ह्याप्रमाणें तो प्रबल होऊं लागला, तेव्हां पुण्यांतील कारभारी लोकांनीं पहिल्यानें त्याशीं तह करावयाचा, असें बाह्यात्कारें दर्शवून एकाएकी राजमाची एथें त्यावर हल्ला केला; तेव्हां तो तेथून कुलाब्यास पळून गेला. तेथें आंग्र्यानें त्याला कैद करून पुण्यास पाठविलें. तेव्हां पेशव्यांनीं त्यास हत्तीचे पायाशीं बांधून मारिलें असें म्हणतात.

रघुनाथरावाचा पक्ष इंग्रज लोक पुनः धरितात आणि वडगांवच्या लढाईत पराभव पावतात.

९. मुंबईसरकारानें सदोबाचा सन्मान केला, व रघुनाथरावाला आपल्या आश्रयास राहूं दिलें, हें त्यांचें आचरण पुरंदरच्या तहाविरुद्ध झालें, असें सबब दाखवून नानाफडनवीस पुरंदरच्या तहासंबंधीं इंग्रजांचें कांहीं देणें राहिलें होतें तें लांबणीवर टाकूं लागला. तसेंच विलायतेमध्यें फ्रेंच आणि इंग्रज ह्यांचें युद्ध चाललें असतां ही फ्रेंचांचा वकील पेशव्यांचे दरबारीं आला होता, त्यास नानानें पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. ह्या दोन कारणांनीं इंग्रजांच्या मनांत वैषम्य उत्पन्न झालें. ह्याच संधीस पुण्यांतील कारभारी लोकांत वैमनस्यें पडून नानाचा चुलत बंधु मोरोबादादा फडनवीस ह्यानें मुंबईसरकारचे

मदतीनें पुनः **रघुनाथरावास** गादीवर बसविण्याचा यत्न चालविला. **मुंबईसरकारानें** ही वर सांगितलेल्या दोन कारणांनीं त्याच्या मदतीस फौज पाठविली. ती व **रघुनाथरावाची** फौज मिळून **पुण्यावर** येत असतां, वाटेंतच **वडगांव** मुक्कामीं **महादजी शिंदे** व **हरीपंत फडके** ह्यांनीं त्यांचा पराभव केला, त्यामुळें त्यांस तहाचें बोलणें लावून परत **मुंबईकडे** जाणें भाग पडलें. तेव्हांपासून पुढें तीन वर्षं पर्यंत **मराठे** व **इंग्रज** ह्यांच्यामध्यें लढाई चालूच होती. परंतु तींत कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं तह होऊन उभयतांचा कलह संपला.

रघुनाथरावाचा मृत्यु व त्याच्या पुत्रांचीं नांवें.

६. राज्यप्राप्तीविषयीं आपला सर्व उद्योग व्यर्थ गेला, असें पाहून **रघुनाथरावानें** तो नाद सोडून दिला, आणि **पेशव्याच्या** पूर्वींच्या म्हणण्याप्रमाणें तो **कोंपरगांवीं** जाऊन स्वस्थ राहिला. तेथें तो इ० स० १७७४ ह्या वर्षीं मृत्यु पावला. त्याला दोन औरस पुत्र होते. त्यांत वडील **बाजीराव** (तोच पुढें **पेशवाईचे** गादीवर बसला.) आणि धाकटा **चिमणाजी आपा** ह्यांखेरीज **अमृतराव** म्हणून त्यास एक दत्तक पुत्र होता.

टिपू सुलतान.

७. **इंग्रज** व **मराठे** ह्यांचा ज्या वेळेस वर सांगितलेला तह झाला, त्याच वेळेस **म्हैसूरचा टिपूसुलतान** हा **पेशव्यांचे** मुलखांत फार उपद्रव करूं लागला; व **इंग्रज** लोकांचा

**मित्र त्रावणकोरचा** राजा ह्याशीं ही त्यानें युद्ध केलें. ह्या कारणांवरून **इंग्रज** व **पेशवे** ह्यांनीं त्याचें पारिपत्य करण्याचा विचार ठरविला. कांहीं दिवसांपूर्वीं **निजामअल्ली** आणि **पेशवे** ह्यांचा असा तह झाला होता कीं, प्रसंगीं परस्परांनीं परस्परांस साह्य करावें. त्या तहाप्रमाणें **निजामअल्ली** ही त्या उभयतांस मिळाला. नंतर त्या तिघांनीं आपल्या फौजा एकत्र करून प्रथम **धारवाड** किल्ला घेतला, व **श्रीरंगपट्टणास** घेरा घालून तेथें **टिपूला** पकडण्याचा बेत आणिला. तेव्हां **टिपूनें** तह करून आपल्या मुलखापैकीं अर्धा मुलूख व एक कोटि पासष्ट लक्ष रुपये रोकड देण्याचें कबूल केलें; आणि ह्या ऐवजांचा भरणा होई तोंपर्यंत आपले दोघे पुत्र ओलीस पाठविण्याचेंही पतकरलें. नंतर तो मुलूख व रोकड हीं तिघांनीं कराराप्रमाणें सारखी वांटून घेतलीं. त्यांत **मराठ्यांच्या** वांटणीस **वर्धा** आणि **कृष्णा** ह्या दोन नद्यांच्या मधील बहुतेक मुलूख व **बिलारीपाशीं सोंडून** नामें **खोरें** आहे तें, इतकें मिळून सुमारें चाळीस लक्षांचा मुलूख आला.

महादजी शिंद्याचा मृत्यु.

८. ह्याप्रमाणें **टिपूचा** बंदोबस्त झाला, तोंच **नानाफडनविसास** दुसरी एक चिंता उत्पन्न झाली. ती अशी, **महादजी शिंदा** ह्यानें **दिल्ली** प्रांतांत **रजपूत** व **मोंगल** ह्यांशीं मोठमोठ्या लढाया करून जय मिळविला; तेणेंकरून **दिल्लीच्या** दरबारीं त्याची मोठी ख्याति झाली. पुढें **पुण्यांतील** सर्व कारभारी लोकांमध्यें ही

आपणास मोठेपणा मिळावा अशा हेतूनें तो **नानाफड-णविसाशीं** आंतून द्वेष करूं लागून **सवाई माधवरावानें** आपल्या मतानें वागावें म्हणून **पुण्यांत** राहून त्यानें पुष्कळ खटपट आरंभिली व **दिल्लीच्या** बादशाहापासून **पेशव्याकरितां** वकील *मुतलक ही पदवी मिळविली आणि **पुण्यामध्यें** मोठ्या समारंभानें ती **माधवराव** ह्यास दिली. ह्याप्रमाणें **पेशव्यास** वश करण्याकरितां त्याचा प्रयत्न चालला असतां **नानानें** पेशव्याशीं एकांत करून त्याचें मन पुन्हा आपणाकडे वळविलें. इतक्यांत **महादजी शिंदा** ह्यास मोठा ज्वर येऊन तो इ० स० १७९४ च्या फेब्रुवारी महिन्यांत १२ व्या तारखेस **पुण्याजवळ वानवडी** मुकामीं मृत्यु पावला. **महादजीस** संतान नव्हतें, म्हणून त्याच्या भावाचा नातू **दवलतराव शिंदा** हा त्याच्या पाठीमागें त्याचा अधिकार चालवूं लागला.

खरड्याची लढाई.

९. **महादजी शिंदा** जिवंत असतां **निजाम अल्ली**-पासून चौथाई व सरदेशमुखी ह्यां-बद्दल पुष्कळ दिवसांचा थकलेला पैसा मागून घ्यावा, असा सर्व **मराठ्यांचा** विचार ठरला होता. परंतु **महादजी** एकाएकी मेल्यामुळें तें काम मुख्यत्वें करून एकट्या **नानावर** पडलें. तेव्हां त्यानें आपले दोन वकील **निजामाचे** दरबारीं बाकी मागावयाकरितां पाठविले. परंतु ती बाकी न देतां उलटें

---

* ह्या पदवीचा अर्थ 'मोंगलाच्या राज्यांतील मुख्य कारभाऱ्याचा दुय्यम' असा दिसतो.

**निजामाचा** कारभारी **मशीर उलमुलुख** हा भर दरबारांत त्या वकीलांच्या समक्ष **नानाची** निंदा करून काहीं धमकीचीं भाषणें बोलला. तेव्हां अर्थातच उभय पक्षीं युद्धाची तयारी झाली. त्या प्रसंगीं **मराठे** सरदारांची एके ठिकाणीं जमलेली फौज सुमारें एक लक्ष तीस हजारांवर होती. **निजामा**ची फौज ही एक लक्ष दहा हजार होती. इ० स० १७९५ ह्या वर्षी मार्च महिन्याचे ११ वे तारखेस **निजामा**चे राज्यांतील **खरडें** ह्या गांवाजवळ त्या दोन लष्करांची गांठ पडून ते दिवशीं थोडें युद्ध झालें. त्यांत **निजामा**चा जय झाल्यासारखा दिसला. परंतु दुसऱ्या दिवशीं युद्धांत त्याचा बराच मोड होऊन त्याला मागें हटावें लागलें. पुढें तेच दिवशीं रात्रीस अंधारामध्यें **मराठ्यां**चे दहा बारा स्वार आपल्या घोड्यांकरितां पाणी शोधीत असतां चुकून **निजामा**च्या एका टोळींत शिरले. तेव्हां शत्रूचा छापा आला अशा भ्रांतीनें **निजामा**चे लष्करास मोठी भीति पडून ज्यास जिकडे वाट सांपडली तिकडे तो पळूं लागला. ह्याप्रमाणें **निजामा**च्या फौजेची दाणादाण झाली; तेव्हां तो ही भिऊन **खरड्या**चे किल्ल्यांत शिरला. त्यावेळीं त्याचे जवळ त्याच्या फौजेपैकीं सारी दशांश फौज राहिली होती. हें **मराठ्यास** कळतांच, त्यांनीं त्या किल्ल्यास वेढा घालून दोन दिवस युद्ध केलें. शेवटीं मार्च महिन्याच्या १९ व्या तारखेस **निजामानें** तहाचें बोलणें लाविलें. त्यांत **मराठ्यांनीं** आपली बाकी तीन कोटि रुपये, स्वारीचा खर्च, व कांहीं मुलूख, इतकें मागून **मशीर**

**उल्मुलुख** ह्यास आमचे स्वाधीन करावें, असा आग्रह धरिला. तेव्हां त्यांचे सारें मागणें कबूल करून **निजामानें** **मशीर उल्मुलुखास** त्यांजकडे पाठविलें. **सवाई माधवरावापुढें मशीर उल्मुलुखास** आणिलें, ते समयीं **माधवरावाचें** तोंड सुकलें. हें पाहून कोणीं त्याचें कारण त्यास पुसलें; तेव्हां तो म्हणाला कीं, **मोंगलांनीं** भित्रेपणानें व्यर्थ आपली एवढी अमर्यादा करून घेतली; व आमचे लोकांस यत्नावांचून जय मिळाला असतां ही ते उगेच फुशारकी मारितात, असे उभय पक्षांचेही लोक अप्रयोजक पाहून माझें मन फार खिन्न होतें. असो, **खरड्याच्या** लढाईचा शेवट ह्या रीतीनें झाला. **मशीर उल्मुलुख** ह्यास ह्यावेळीं **पेशव्यांनीं** बंदींत ठेविले होते; परंतु पुढें **बाजीरावाचे** कारकीर्दींत कांहीं राज्यकारणांमुळें त्यास त्यांनीं सोडून दिलें.

सवाई माधवरावाचा मृत्यु.

१०. ह्याप्रमाणें **सवाई माधवरावाच्या** कारकीर्दींत **मराठ्यांचा** उत्कर्ष झाला. परंतु त्या यशाचा वांटा **माधवरावास** कांहींच मिळाला नाहीं. कारण पहिल्यानें तो अल्पवयाचा असल्यामुळें **नानाफडनवीसच** मुकत्यारीनें वागत होता; आणि पुढें त्यास कांहीं समजूं लागलें तेव्हांही **नानानें** आपलें महत्व जाईल या भीतीनें त्यास अगदीं आपले कबजांत ठेविलें होतें. अशा परतंत्रपणामुळें **माधवरावास** फार त्रास उत्पन्न होऊं लागला. **पुढें रघुनाथरावाचा** वडील पुत्र **बाजीराव** हा **शिवनेरी** किल्ल्यामध्यें बंदींत होता, तो मोठा गुणवान आहे असें

माधवरावाच्या कानीं आल्यावरून बाजीरावाशीं आपला स्नेह असावा असें त्यास वाटूं लागलें. परंतु ही गोष्ट नानास आवडत नव्हती; म्हणून त्यांनीं परस्परांशीं गुप्तरूपें पत्रव्यवहार चालविला. हें वर्तमान नानास कळतांच त्यानें माधवरावाची फार निर्भर्त्सना करून, ज्याचे द्वारें त्या उभयतांचें दळणवळण चाललें होतें त्याचे पायांत बिड्या घातल्या; आणि बाजीरावाच्या भोंवतालचा बंदोबस्त जास्त केला. ह्या गोष्टीमुळें तर माधवरावास फारच त्रास येऊन तो आपल्या जिवास अगदीं कंटाळला. तेव्हां इ० स० १७९५ ह्या वर्षी अक्टोबरच्या बाविसाव्या तारखेस म्हणजे शके १७१८ ह्या वर्षी दसऱ्याच्या दिवशीं त्यानें आपल्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावरून कारंजावर उडी टाकिली. त्यामुळें तो तिसरे दिवशीं मृत्यु पावला.

---

# दुसरा बाजीराव साहेब ह्याचें वर्णन.

इ० सन १७९६ ह्या वर्षापासून इ० सन १८१८ ह्या वर्षापर्यंत.

बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात.

१. सवाई माधवराव ह्यानें मरतेसमयीं आपला संबंधी व परम मित्र बाजीराव ह्यास पेशवाईची गादी देण्याविषयीं सांगितलें होतें. परंतु तसें करणें नानाफडनविसास इष्ट नव्हतें; कारण तेणेंकरून आपलें महत्व कमी होऊन कदाचित् जिवासही धक्का पोंचेल,

असें त्यास भय होतें. ह्यामुळें त्यानें इतर बहुतेक कारभारी लोक वश करून घेऊन असें ठरविलें कीं, **सवाई माधवरावाच्या** बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन तो **पेशवा** करावा. हें वर्त्तमान **बाजीरावास** कळतांच त्यानें **शिंद्याचा** मुख्य कारभारी **बाळोबा तात्या** ह्याच्या द्वारें गादी मिळविण्याचा यत्न चालविला. तो **नानास** समजला तेव्हां, ही गोष्ट **बाळोबाच्या** हातून होण्यापूर्वीं आपणच करावी हें बरें, असें त्यास वाटून त्यानें **बाजीरावास शिवनेरीहून पुण्यास** आणविलें, आणि आपणाकडे मुख्य कारभार राखण्याविषयीं त्यापासून करार करून घेऊन त्याला गादीवर बसविण्याची तयारी चालविली. इतक्यांत ही गोष्ट आपल्या सल्ल्यावांचून होते हें **बाळोबा तात्यास** समजतांच, त्याला राग आला; आणि त्यानें **बाजीरावास** कैद करून त्याच्या धाकटा भाऊ **चिमणाजी आपा** ह्यास इ० सन १७९६ च्या मे महिन्यांत गादीवर बसविलें, व **परशुरामभाऊ पटवर्धन** ह्यास त्याचा कारभारी केलें. पुढें **नानानें** महाप्रयासें करून **दवलतराव शिंदा** वश करून घेतला; आणि त्याजकडून त्याचा कारभारी **बाळोबा तात्या** ह्यास कैद करवून त्याच्या मदतीनें **बाजीरावास** इ० सन १७९६ च्या दिसेंबरांत गादीवर बसविलें. नंतर **नाना** पुनः मुख्य कारभार करूं लागला.

नानाफडनवीस कैदेंत पडतो, व शिंदा पुणें शहर लुटतो.

२. बाजीरावास पेशवाईचा अधिकार प्राप्त झाला तेव्हां, जरी त्यानें नानाला मुख्य कारभारावर नेमिलें होतें, तरी पुढें नाना व नानाच्या पक्षाचे लोक ह्यांस राज्यकारभारांतून काढून टाकावें, अशी त्याला फार इच्छा उत्पन्न होऊन त्यानें त्याविषयीं प्रयत्न चालविला. तो प्रकार असा.—प्रथमतः त्यानें, दवलतराव शिंद्याचा सासरा सर्जेराव घाडगा ह्या नामें होता, त्याचें आणि नानाचें वैमनस्य पाडिलें; आणि शिंद्याकडून नानाला कैद करण्याविषयीं त्याला सुचविलें. तेव्हां सर्जेरावाच्या सांगण्यावरून शिंद्यानें नानास कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. त्याच वेळीं सर्जेरावानें आपले लोक नाना व त्याचे पक्षपाती ह्यांचीं घरें लुटावयास पाठविले. तेव्हां ज्याप्रमाणें एखाद्या शत्रूचें शहर लुटावें त्याप्रमाणें त्यांनीं पुणें शहर लुटून तेथें एक रात्र आणि एक दिवस एकसारखी दाणादाण करून सोडली. ह्याप्रमाणें नानाची दुर्दशा करून बाजीराव शिंद्याला ही त्याच्या देशीं घालविण्याची मसलत करूं लागला. परंतु आपणास गादीवर बसविण्याचे कामीं शिंद्यानें मदत करावी म्हणून बाजीरावानें त्याला पूर्वीं दोन कोटी रुपये देण्याचें गुप्तरूपें कबूल केलें होतें; तो ऐवज मिळाल्याशिवाय तो पुणें सोडीना इतकेंच नाहीं, तर त्या ऐवजाकरितां तो तगादा करूंलागला; आणि बाजीरावाला तर त्या प्रसंगीं एवढी रकम देण्याचें सामर्थ्य नव्हतें. तेव्हां त्यानें मुर्खपणानें शिंद्याला अशी मसलत दिली कीं, तुम्हीं सर्जेराव

घाडग्याकडून बाळोजी कुंजर ह्याच्या माहितीनें पुण्यांतील सावकार लोकांपासून बलात्कारानें द्रव्य उत्पन्न करावें. तें शिंद्यानें कबूल करून त्या घाडग्यास त्या कामावर पाठविलें. ते वेळीं घाडग्यानें आपल्या क्रूरपणाची सीमा केली. नानाच्या पक्षाचे जे लोक बंदींत घातले होते त्यांपासून व इतर सावकार वगैरे श्रीमंत लोकांपासून द्रव्य काढण्याकरितां त्यानें त्यांचे मनस्वी हाल केले. ते हाल न सोसल्यामुळें कितीएक लोकांनीं प्राण ही सोडिले.

नाना फडनविसाची कैदेंतून सुटका व त्याचा मृत्यु.

३. नाना कैदेंत पडल्यानंतर बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव ह्यास मुख्य कारभारी केलें. वरील क्रूर कर्मास बाजीरावाचें अनुमोदन होतें, तें अमृतरावास माहित नव्हतें, सबब शिंद्याचाच तो अपराध समजून त्यानें बाजीरावाच्या मतानें त्याला पकडण्याची मसलत केली. परंतु बाजीरावाच्या भित्रेपणामुळें ती फसून बाजीरावाचें आणि शिंद्याचें वैमनस्य पडलें. तेव्हां त्याला भय उत्पन्न करण्याकरितां शिंद्यानें नानाफडनविसास कैदेंतून मुक्त केलें. त्यामुळें बाजीरावास वास्तविकच भीति उत्पन्न होऊन त्यानें शिंदा व नाना ह्यांचा स्नेह आरंभिला; आणि नानाला मोठ्या आर्जवानें पुण्यांत आणून पुनः मुख्य कारभारी नेमिलें. परंतु हें बाजीरावाचें सारें कृत्य मायावीपणाचेंच होतें; कारण पुढें नानाशीं तो एकसारखा कपटानेंच वागत होता. तथापि नानानें राज्यकारभारांत किमपि ही दुर्लक्ष्य केलें नाहीं. शेवटीं इ० सन १८०० ह्या वर्षी मार्च महि-

त्याच्या १३ व्या तारिखेस **नानाफडनवीस** मृत्यु पावला.

नाना फडनविसाचे गुण.

४. **नानाचें** वय लहानपणापासून राजकीय कामें करण्यामध्येंच गेल्यामुळें तो त्या कामांत इतका निपुण झाला होता कीं, त्या वेळीं साऱ्या **हिंदुस्थानामध्यें** त्याच्या इतका राजनीतींत प्रवीण दुसरा पुरुष नव्हता. तो मृत्यु पावला त्या वेळीं **मराठी** राज्यांतील चातुर्य आणि प्रामाणिकपणा हीं त्या बरोबरच गेलीं, असें लोक म्हणूं लागले. त्याची स्मरणशक्तिही अपूर्व होती; व तो दिवसामध्यें इतकें काम आटोपी कीं, तें कोणास सांगितलें असतां आश्चर्यच वाटेल.

यशवंतराव होळकराचे उपद्रवामुळें बाजीराव पळून जाऊन इंग्रजांची मदत मागतो.

५. **नानाफडनवीस** मृत्यु पावल्यानंतर **बाजीरावानें** त्याच्या पक्षाचे लोकांना छळावयास आरंभ केला, त्यामुळें दक्षिणेंत चोंहीकडे धामधूम होऊन गेली. अशा संधींत **यशवंतराव होळकर शिंद्याच्या** मुलखांत लुटालूट करूं लागल्यामुळें **शिंद्याला** आपली बहुतेक फौज घेऊन आपल्या मुलखीं जाणें भाग पडलें. तेव्हां तर **बाजीरावास** आपल्या दुष्ट वासना पूर्ण करावयास चांगली संधि सांपडली. त्यानें आपणास व आपल्या बापास ज्यांनीं ज्यांनीं त्रास दिला होता, त्यांस फार हाल करून जिवें मारिलें. त्यांपैकीं **यशवंतरावाचा** भाऊ **विठोजी होळकर** ह्याला त्यानें हत्तीच्या पायाशीं बांधून मारविलें. इतक्यांत **हिंदुस्थानामध्यें यशवंतराव** हा **शिंद्यापासून** पराभव पावल्यामुळें

तो पुण्याच्या आसमंतात लुटालूट करण्याच्या बेतानें दक्षिणेंत आला. त्याला आपला भाऊ मारिल्याचें वर्त्तमान समजतांच तो लष्करासुद्धां पुण्यावर आला, आणि त्यानें पुण्यांत शिंद्याचें जें लष्कर राहिलें होतें तें व बाजीरावाचें लष्कर ह्यांचा अगदीं मोड केला. हें पाहतांच बाजीराव सिंहगडास पळून गेला. पुढें तेथून ही रायगडास जाऊन त्यानें मुंबई सरकारचें आर्जव आरंभिलें. तेव्हां इंग्रजांनीं त्याला वसईस आपल्या आश्रया खालीं नेलें. इकडे होळकरानें अमृतरावाच्या पुत्र विनायकराव ह्यास पेशव्याचे गादीवर बसविलें. तेव्हां बाजीरावानें इंग्रजांशीं तहाचें बोलणें लावून पुनः गादी मिळविण्याकरितां त्यांची मदत मागितली.

वसईचा तह.

६. इंग्रजांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें कबूल करून असा तह ठरविला कीं, इंग्रजांचें आठ हजार सैन्य उभयतांच्या शत्रूंच्या निवारणार्थ बाजीरावानें नेहमी आपल्या राज्यांत राहूं द्यावें; व त्या सैन्याच्या खर्चाकरितां वीस लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा. ह्याखेरीज दुसरीं कांहीं किरकोळ कलमें त्या तहांत होतीं. हा तह इ० सन १८०२ ह्या वर्षी दिसेंबर महिन्याच्या २१ वे तारखेस झाला. तो वसई मुक्कामीं झाला, म्हणून त्याला वसईचा तह म्हणतात.

बाजीरावास पुनः राज्य मिळणें.

७. ह्याप्रमाणें मराठ्यांचें स्वातंत्र्य नाहींसें करणारा तो तह उभयपक्षीं कबूल झाल्यावर इंग्रज लोक बाजीरावाला गादीवर बसविण्याकरितां पुण्यास घेऊन

थऊं लागले. हें यशवंतराव होळकरास समजतांच, पुणें शहरांतून लुटीच्या योगानें पुष्कळ द्रव्य उत्पन्न करून तो माळव्याकडे पळून गेला. नंतर इंग्रजांचें सैन्य पुण्यास पोहोचलें, तेव्हां त्यांनीं बाजीरावाला इ० सन १८०३ ह्या वर्षी मे महिन्याचे १३ वे तारिखेस मोठ्या समारंभानें पुन: गादीवर बसविलें; आणि यशवंतरावानें पूर्वी ज्याचे पुत्रास गादीवर बसविलें होतें त्या अमृतरावास प्रतिवर्षी खर्चाकरितां आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याला त्याच्या पुत्रासहित काशीस नेऊन ठेविलें. नंतर तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रजांनीं आपलें सैन्य आणून घोडनदीच्या कांठीं छावणी केली. त्या छावणीमुळें तेथें एक गांवच वसला; त्या गांवाला मराठे लोक घोडनदी म्हणतात, व इंग्रज लोक शिरूर म्हणतात. त्या छावणींतील लोक पुढें इ० सन १८१८ ह्या वर्षी निघून गेल्यानंतर तेथील वस्ती कमी झाली.

बाजीरावाचें दुर्वर्तन व इंग्रजांशीं गुप्तरूपें कृतघ्नपणाचें आचरण.

८. बाजीरावानें इंग्रजांशीं सख्य केलें खरें; परंतु ही गोष्ट त्यानें आपणावर महत्संकट पडल्यामुळें निरुपाय होऊन केली होती, असें त्याच्या कृतघ्नतेच्या आचरणावरून पुढें दिसून आलें. गादीवर बसतांच त्यानें आपलें दुर्वर्तन सुरू केलें. रास्ते वगैरे कितीएक जाहगीरदारांच्या जाहगिरी त्यानें कपटानें बळकाविल्या. त्रिंबकजी डेंगळा नामें कोणी जासूद होता, तो बाजीरावास फार आवडून त्यानें त्याला इत-

क्या योग्यतेस चढविलें कीं, पेशव्याच्या दरबारांत त्याच्या वांचून कोणतेंच काम होईनासें झालें. तो त्रिंबकजी तर क्रूरपणाची मूर्तिच होता. मक्त्याचें मामलती वगैरे करणारांकडून मक्त्याच्या कामांत कांहीं अंतर पडल्यास तो बाजीरावाचे देखत त्यांना पराकाष्टेची हाणमार करी. कांहीं प्रसंगीं तर त्यानें मक्तेदारांस जिवें ही मारिलें. तरी त्याचें बाजीरावास बिलकूल वाईट वाटलें नाहीं. ह्याप्रमाणें ह्या उभयतांच्या दुष्टपणामुळें पुष्कळ लोक त्रासून गेले. तथापि बाजीरावाला वसईच्या तहांत ठरल्याप्रमाणें इंग्रज लोकांची मदत असल्यामुळें फारशीं बंडें वगैरे न होतां इ० १८१७ ह्या वर्षापर्यंत त्याचें राज्य सुरक्षितपणें चाललें. शेवटीं त्रिंबकजी डेंगळ्याच्या मसलतीनें तो महाकृतघ्न पुरूष इंग्रजांस ही घालवून देण्याचा विचार करूं लागला. त्यानें प्रथम शिंदा व रघूजी भोंसला ह्यांजकडे वकील पाठवून गुप्तरूपें त्यांच्याशीं तह केला कीं, तुम्ही व आम्ही एक होऊन इंग्रजास हाकून देऊं; आणि लुटालूट करून आपला निर्वाह करणारे जे पेंडारी लोक ते हिंदुस्थानांत व दक्षिणेंत बरेच प्रबळ झाले होते, त्यांची अनुकूलता करून घेण्याकरितां बाजीराव कोपरगांवास जाऊन त्यांच्या मुख्यांच्या भेटी घेऊं लागला. ही गोष्ट इंग्रजांच्या समजण्यांत आली; परंतु तीविषयीं त्यांना पक्का शोध लागेना, त्यामुळें त्यांनीं ती मनावर घेतली नाहीं; तथापि बाजीरावावरील त्यांचा विश्वास नाहींसा होण्यास आणखी एक कारण झालें. तें असें कीं, गाई-

कवाडाकडे पेशव्याची कांहीं खंडणीबद्दल वगैरे बाकी राहिली होती, तीसंबंधीं बोलणें करावयाकरितां गाइकवाडानें आपला गंगाधर शास्त्री पटवर्धन नामें वकील पेशव्याचे दरबारीं पाठविला होता. परंतु त्यास रवाना करण्यापूर्वीं त्रिंबकजी डेंगळ्याच्या हातून त्याला कांहीं इजा होणार नाहीं, अशाविषयीं इंग्रजांचें त्यानें अभयवचन घेतलें होतें. तथापि बाजीरावानें पंढरपूर मुक्कामीं इ० सन १८१५ ह्या वर्षीं त्रिंबकजीच्या हातूनच गंगाधर शास्त्री ह्यास मारविलें. ही गोष्ट इंग्रजांस समजतांच त्रिंबकजीला आपले स्वाधीन करण्याविषयीं त्यांनीं बाजीरावास निक्षून सांगितलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें न केल्यास त्यांच्याशीं युद्धास उभें राहावें लागणार असें पाहून बाजीरावानें त्रिंबकजीला इंग्रजांचे स्वाधीन केलें. तेव्हां त्यांनीं त्याला ठाण्याचे किल्ल्यामध्यें बंदींत ठेविलें. परंतु सुमारें एक वर्षानें तो वेष बदलून तेथून पळाला, आणि नाशिकाच्या आसपास भिल्ल व रामोशी ह्यांच्या आश्रयानें दंगा करूं लागला. पुढें बाजीरावाचें आणि त्याचें गुप्तरूपें दळण वळण सुरू होऊन इंग्रज लोकांच्या नाशाकरितां नवीन फौज ठेवण्यास बाजीरावानें त्याकडे पैसा पाठविला; आणि शिंदे, होळकर, भोंसले, व पेंढारी, ह्यांशीं पत्रद्वारें ऐक्य ठेवून स्वतः ही नवीन फौज ठेवण्यास त्यानें आरंभ केला. हे इंग्रजांस समजतांच त्यांनीं प्रथमतः त्रिंबकजी डेंगळ्यास धरून देण्याविषयीं बाजीरावाला सांगितलें. तेव्हां आम्हाला त्याचा ठिकाण मुळींच लागत नाहीं,

असें त्यानें उत्तर दिलें. परंतु इंग्रजांनीं पुनः त्याला लढाईची धमकी दिल्यामुळें त्यानें त्रिंबकजीस धरण्याकरितां जाहिरनामे लाविले; आणि तो इंग्रजांच्या स्वाधीन होईतोंपर्यंत सिंहगड, पुरंदर, व रायगड हे किल्ले त्यांजकडे ठेवण्याचेंही त्यानें कबूल केलें. ह्याखेरीज इंग्रजांनीं त्याजपासून नवा तह करून घेतला. त्या नहांत वसईच्या तहापेक्षां बाजीरावाचें स्वातंत्र्य पुष्कळ कमी झालें.

बाजीराव इंग्रजांशीं उघडपणें वैर करितो.

९. वर सांगितलेल्या नव्या तहामुळें इंग्रजांविषयीं बाजीरावाच्या मनांतील वैषम्य ज्यास्त वाढून त्यांच्या नाशाची तयारी तो फारच झटून करूं लागला. ह्या प्रसंगीं त्याला मुख्य मसलत देणारा बापू गोखला नांवाचा कोणी गृहस्थ करनाटकच्या सरसुभेदाराचा पुतण्या होता. तो स्वभावानें फार क्रूर होता तरी तो मोठा पराक्रमी असे, त्यामुळें तो बाजीरावास आवडून त्यानें त्याला आपल्या सैन्याचा अधिकार दिला होता. ह्या उभयतांनीं असा बेत केला कीं, आपली सर्व तयारी झाली म्हणजे इंग्रजांवर एकाएकीं हल्ला करावा. ह्या त्यांच्या बेतास अनुकूल अशी दुसरी एक गोष्ट घडून आली. ती ही कीं, ह्याच समयास चोहोंकडे पेंढाऱ्यांचा दंगा फार उसळला. ह्यामुळें गव्हरनर जनरल ह्यानें कलकत्ता, मुंबई व मद्रास ह्या तिन्ही ठिकाणच्या लष्करांनीं जाऊन तो मोडून टाकावा, असा हुकूम केला. त्यावरून घोडनदी येथील लष्कर ही त्या कामास चाल-

तें झालें. ह्यामुळें पुणें मुक्कामीं जी कांहीं इंग्रजांची थोडीशी फौज होती, तेवढीच जिंकली म्हणजे आपलें काम होईल, असें बाजीरावास वाटलें. सबब त्यानें पुण्याजवळ लष्कर जमविण्यास आरंभ केला.

खडकीची लढाई

१०. बाजीरावाच्या लष्कराची बहुतेक सिद्धता झाली; तरी पुण्यांतील इंग्रजांच्या लष्करापैकीं पलटणी लोकांत फितूर करण्याचा आपण उद्योग करावा असें त्याच्या मनांत होतें, सबब तो एकदम लढाईस आरंभ करीना. इतक्यांत मुंबईहून कांहीं गोरे लोक त्या लष्कराच्या मदतीस येऊन पोहोंचले व घोडनदीकडचें ही राहिलेलें लष्कर यावयास निघालें; हें समजतांच बाजीरावानें युद्धास आरंभ करण्याविषयीं आपल्या लोकांस हुकूम दिला. तेव्हां बापू गोखल्यानें खडकी मुक्कामीं इंग्रज लोकांवर इ० सन १८१७ ह्या वर्षीं नोवेंबर महिन्याच्या पांचव्या तारखेस हल्ला केला. त्या दिवशीं कांहीं काळपर्यंत युद्ध होऊन शेवटीं मराठ्यांचा कांहींसा मोड झाला. दुसरे दिवशीं घोडनदीचें पलटण पुण्यास येऊन दाखल झालें. तेव्हां बापू गोखला युद्धास उभा राहीना. इकडे जनरल स्मिथ साहेब पेंढाऱ्यांचें पारिपत्यास गुंतला होता, त्याला हें लढाईचें वर्तमान कळतांच घोडनदीचें लष्कर पेंढाऱ्यावर गेलें होतें, तें बरोबर घेऊन तो पुण्यास आला. तेव्हां बाजीराव इंग्रजांशीं युद्ध करणें सोडून साताऱ्याकडे पळत सुटला; व स्मिथ साहेब त्याचे पाठीस लागला.

कोरेगांवची लढाई.

११. बाजीराव पळतां पळतां साताऱ्याहून पंढरपुरास आला व तेथें साताऱ्याचे राजालाही आपणाबरोबर पळावयाकरितां आणवून त्यासहित जुनराजवळ ब्राम्हणवाड्यांत गेला. तेथें त्रिंबकजी डेंगळाही कांहीं लोकांसहित त्याला येऊन मिळाला. परंतु इतक्यांत स्मिथ साहेब बाजीरावाचा पाठलाग करीत आला; तेव्हां तो लष्करासुद्धां पुण्याकडे परतला. हें वर्तमान पुण्यांतील इंग्रजांच्या लष्करास कळतांच त्याच्या अधिकाऱ्यानें आपल्या मदतीकरितां घोडनदीहून पुनः सैन्य बोलाविलें. तें सैन्य पुण्याकडे येत असतां भिमेच्या कांठीं कोरेगांव मुक्कामीं इ० सन १८१७ च्या दिसेंबर महिन्यांत त्याची व बाजीरावाची गांठ पडून युद्धास आरंभ झाला. ते समयीं बाजीरावाचें सैन्य ३०,००० असतांही इंग्रजांच्या सुमारें ९०० लोकांनीं गांवांत शिरून शत्रूस गांवांत येऊं न देतां मोठ्या शौर्यानें एक दिवसपर्यंत आपले रक्षण केलें. त्या लढाईंत इंग्रजांचे सुमारें ३०० शिपाई व वीस गोरे लोक पडले; आणि मराठ्यांकडील सुमारें पांच सहाशें लोक पडले. ह्या ठिकाणीं इंग्रजांकडील फक्त ९०० लोकांनीं मराठ्यांचें एवढें मोठें सैन्य असतांही त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं, ह्या त्यांच्या विलक्षण पराक्रमाचें स्मरण सर्वांस राहण्याकरितां इंग्रजांनीं त्या ठिकाणीं रणस्तंभ बांधून ठेविला आहे.

१२. ज्या दिवशीं **कोरेगांवची** लढाई झाली, त्याच्या दुसऱ्या दिवशीं **बाजीरावास** कळलें कीं, **स्मिथ साहेब** जवळ येऊन पोहोंचला. तेव्हां तो तेथून छावणी उठवून पुन: पळत सुटला. तो पळतां पळतां **अष्टें** मुक्कामीं जाऊन उतरला. इतक्यांत **स्मिथ साहेब** अकस्मात् तेथें दाखल झाला. तेव्हां त्या उभयतांची लढाई सुरू होऊन **मराठ्यांचा** अगदीं मोड झाला. ह्या लढाईंत **बापू गोखला** रागानें ३०० स्वारांसहित जिवावर उदार होऊन **इंग्रजांच्या** एका पलटणीवर जाऊन पडला. तेव्हां त्यांनीं त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें. ह्या ठिकाणींच **सातारचा राजा** आपल्या परिवारासुद्धां **इंग्रजांच्या** हातीं लागला.

अष्ट्याची लढाई व बापू गोखल्याचा मृत्यु.

१३. **बाजीराव अष्ट्याहून** पळून **नागपूरकराचा** आश्रय करण्याकरितां त्याच्या मुलखांत शिरला. तेथें ही **इंग्रजांच्या** एका टोळीची गांठ पडून तिनें त्याजवळ राहिलेल्या लोकांची वाताहत केली. तेव्हां त्याच्या बरोबरचे बहुतेक जाहगीरदार त्याला सोडून आपापल्या ठिकाणीं गेले. ह्याप्रमाणें त्याचे सारे उपाय थकल्यामुळें, **माल्कम साहेब** हा पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करून लष्करासुद्धां **इंदुरा**जवळ राहिला होता, त्यास तो इ० सन १८१८ ह्या वर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या तारिखेस शरण जाऊन त्याच्या स्वाधीन झाला; आणि राज्याची आशा सो-

पेशवा इंग्रजांचे हातीं सांपडून राज्यास मुकतो.

डून इंग्रज लोक ठेवतील त्याप्रमाणें राहण्यास कबूल झाला.

१८ बाजीराव हातीं लागल्यावर इंग्रजांनीं त्याला दरसाल आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन ब्रम्हावर्तांत नेऊन ठेविलें. ह्याच सुमारास त्यांनीं त्रिंबकजी डेंगळा ह्याला खानदेशांत पकडून काशीप्रांतांत चुनारगड नामें बळकट किल्ला आहे तेथें जन्मपर्यंत कैदेंत ठेविलें. साताराचा राजा इंग्रजांचे हातीं लागला म्हणून मागें सांगितलें, त्यास त्यांनीं मोठ्या समारंभानें साताराचे गादीवर बसवून निरा आणि वारणा ह्यांच्या मधील पूर्व पश्चिम सह्याद्रीपासून पंढरपुरापर्यंत प्रदेश त्याच्या स्वाधीन केला. बाकीचा संपूर्ण प्रदेश इंग्रजांनीं आपणाकडे ठेवून, पूर्वीं पेशव्यांच्या दरबारीं त्यांचा एल्फिन्स्टन् नामें वकील होता, तोच त्या जिंकिलेल्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां नेमिला. तो साहेब फार चतुर व मराठी राज्याचा माहितगार होता. त्यानें असा बंदोबस्त केला कीं, पेशवे सरकारच्या पदरचे सरदार, मुत्सद्दी, व आश्रित वगैरे लोक ह्यांस आपला धनी गेल्याचें दुःख न व्हावें, आणि त्यांचा प्रतिष्ठितपणानें निर्वाह होऊन अब्रू कायम राहावी, म्हणून त्यानें कितीएकांस जाहगिरी दिल्या, कितीएक बडे लोकांस पेनशनें करून दिलीं; आणि कितीएकांस वर्षासनें करून दिलीं. इनामें, देवस्थानें, व धर्मादाय हे खर्च पहिल्यापासून जसे चालत आले होते, तसेच त्यानें पुढें चालविले; लहानसहान बडे

बाजीरावाची व त्यापासून घेतलेल्या राज्याची इंग्रजांनीं केलेली व्यवस्था.

मोडून टाकिलीं; आणि रयतेस सुख होण्यासाठीं न्याय मनसुबी चांगली व्हावी व कोणावर विनाकारण जुलूम होऊं नये असा बंदोबस्त करून ठेविला. त्यानें केलेली व्यवस्था अद्यापि बहुतेक त्याचप्रमाणें चालली आहे. त्या साहेबानें लोकोपकारार्थ जीं मोठमोठीं कृत्यें केलीं त्यांचें स्मरण करून अद्यापि लोक त्याची कीर्ति गात आहेत.

समाप्त.